आज युवकांना नोकरीपेक्षा शिक्षण-प्रशिक्षण देऊन शासनाच्या सहकार्याने आत्म-विश्वास आणि स्वावलंबनाच्या बळावर "उद्योजक" म्हणून पुढे यावे असे आवाहन केले जाते. सद्य परिस्थितीत ते अत्यंत उचितही आहे. पण आता ग्रामीण, अतिग्रामीण आणि विशेषतः आदिवासी क्षेत्रात उद्योजकता वाढीला लागणे महाकठीण वाटते. प्रत्यक्षात उद्योजकता वाढीची कल्पना मूर्त रूपात साकार होण्यात कोण-कोणत्या अडचणी आहेत, किंबहुना अडचणी असू शकतील त्याचा विचार प्रस्तुत लेखात संक्षेपाने करावयाचा आहे.

दळणवळण सुविधांचा अभाव

या संदर्भात पहिली उणीव भासते ती म्हणजे वाहतूक आणि दळणवळण, सुविधांचा अभाव. आदिवासी क्षेत्र अतिग्रामीण क्षेत्रापुरताच विचार येथे करावयाचा असल्यामुळे कोठूनही झटकन संपर्क साधण्याची सोय नाही. किमान ७५ ते १०० किलो मीटर आत हा भाग असतो. रेल्वे, खासगी माणसांची वाहतूक करणारी बस, टॅक्सीची व्यवस्था तर दूरच पण बस व्यवस्थाही त्याच्याही काही व्यावहारिक अडचणी असल्यामुळे महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या नियंत्रणानुसार अत्यंत मर्यादित असते. त्यामुळे सांस्कृतिक अभिसरण, प्रेरणा प्राप्ती, संपर्कातून नवीन गोष्टी, शिकणे, नव्या जगाची आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होणे अवघड होऊन बसते. प्रवासखर्च भरमसाठ वाढतो. बेरोजगार युवावस्थेत तरी यावर काही उपाय योजूनही सापडत नाही. हा खर्चिक व कालापव्यय करणारा प्रवास झेपत नाही.

जनसंपर्क माध्यमांचा अभाव

दूरभाष किंवा दूरध्वनी मुंबई, पुणे अशा उद्योगसमूह असलेल्या ठिकाणी संपर्क साधताना फारसे उपयुक्त ठरत नाहीत. यात वस्तुस्थिती अशी आहे की, कर्मचाऱ्यांचे संपूर्ण सहकार्य लाभूनही तासन तास टेलिफोन ट्रंककॉलसाठी वाट पाहावी. लागते. शिवाय टेलिफोन लागला तरी बोलणारे म्हणतात तुमच्याशी टेलिफोन वरून मोठ्याने बोलावे लागले की, दिवस-भर डोके दुखते. अशा परिस्थितीत तरी तातडीने मार्गदर्शन आदिवासी क्षेत्रातील उद्योजकांना मिळणे मुष्किल आहे. तार किंवा टेलिग्राम किंवा टपाल व्यवस्था यांचाही विचार केला तर कोणत्याही अतिग्रामीण आदिवासी क्षेत्रात सर्व संबंधितांनी नेटाने प्रयत्न करूनही व टपाल क्षेत्रातील कर्मचाऱ्यांनी सर्व काळजी घेऊनही अपेक्षेपेक्षा जास्त विलंब हा होतोच. समोरच्या मार्गदर्शकांच्या प्रतिसादासाठी अनेकदा तिष्ठत किंवा खोळंबून रहावे लागते आणि त्यामुळे उद्योजकतेची उर्मी कंटाळून ओसरू लागते. प्रारंभीचा उत्साह अशा परिस्थितीत टिकवून ठेवणे अवघड होऊन बसते.

प्रतिसादातही प्रतिकूलता

समजा सगळ्या अडचणींवर मात करून कोणत्याही प्रकारे ना उमेद न होता समक्ष उठून कार्यालयामध्ये वा मान्यवरांकडे युवक भेटण्यास गेला तर तेथे त्याची निवास–भोजनाची व्यवस्था नसते. बेरोजगारीच्या या काळात महापालिका असलेल्या मोठ्या औद्योगिक क्षेत्रात मार्गदर्शनासाठी जाणे, सतत आर्थिक अडचणी न सांगता टाळत राहणे एवढेच शिल्लक उरते. समजा तो तरीही मोठ्या सहाय्यापर्यन्त सल्ला घेण्यासाठी पोहोचला तरी अशा वेळी–अवेळी पोहोचणाऱ्याला लांबून आलेल्या घामाघूम झालेल्या युवकाला अपमानीत होण्याचा प्रसंग येतोच. एक तर त्याने अपॉइंटमेंट घेतलेली नसते. अतिग्रामीण भागातून ती पत्राने घेताही येत नाही. दुसरे तो कोठेही नियोजित वेळेला पोहोचू शकत नाही. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या विश्रांतीच्या, जेवणाच्या, काम संपविण्याच्या अशा अवेळीच तो जेमतेम कार्यालयापर्यन्त जाऊन पोहोचणार. अशा वेळी माणुसकीचा ओलावा असलेले अधिकारी, जरूर सर्व गैरसोय सोसून त्या युवकाला मार्गदर्शन करतील पण पुष्कळदा उपेक्षाच पदरी पडण्याची शक्यता अधिक असते. क्वचित अवमान झाला तरी गिळावा लागतो. ही बुद्धी या उसळत्या युवकास नसते. तो पुन्हा मार्गदर्शनासाठी म्हणून कोणाकडे जायचे नाही असेच ठरवित असेल तर नवल नाही.

कौटुंबिक स्थितीमुळे माघार

आपल्या अनेक युवकांमध्ये स्वतंत्र व्यवसाय थाटावा, उद्योजक म्हणून उभे राहावे अशी उमेद दिसते. पण कौटुंबिक स्थिती तर अनुकूल नसतेच पण पालकांची मनःस्थितीही साथ देत नाही. "उत्तम नौकरी" हा भलताच समज आता रूढ होत आहे. वस्तुतः "कनिष्ठ चाकरी, उत्तम शेती" हा आपला महामंत्र होता. बरं त्यातूनही एखादा युवक प्रतिकूल परिस्थितीतही धडपडतो तरीही त्याला घरच्या नातेवाइकांकडून ना उमेद केले जाते. त्यांना उद्योजकतेऐवजी ते असते उद्योग, नसते उद्योग" वाटतात. आर्थिक व मानसिक पाठिंबा आदिवासी ग्रामीण युवकाला धरून म्हणाल तर अक्षरशः शून्य असतो. कोणीही नोकरीचाच आग्रह धरतो. कारण घरची कमालीची गरिबी. त्यात शिक्षण घेतले आणि पुन्हा पुढे तात्काळ पैसा मिळणार नाही तर वाट पहावी लागेल, जम बसावा लागेल अशा समस्या असतात. उत्साही युवकाने व्यवसायाचे नियोजन केले समजा तो सुरू

केला त्यात काही असे म्हणून बंद करणारे नाउमेद झालेले युवक भेटतात याचे कारण आर्थिक नसो पण मानसिक पातळीवरही पाठिंबा मिळत नाही. जेथे मध्यमवर्गीय पांढरपेशा समाजाची ही स्थिती तेथे आदिवासी क्षेत्राची काय वर्णावी! त्यामुळे आदिवासी क्षेत्रातील उद्योजकतेसाठी असलेल्या विपुल सोयी आणि सुविधाचा लाभही घेता येत नाही.

प्रशिक्षण कौशल्य दुष्प्राप्य

यंत्रसामग्रीचा परिचय, त्या क्षेत्रातील प्रशिक्षण, विक्री, उत्पादनकौशल्य आदिवासी ग्रामीण क्षेत्रातील युवकांना दुष्प्राप्य असतात. अनोख्या दूरच्या मोठ्या शहरातून या सुविधा केल्या जातात आणि तेथपर्यंत पोहोचणे या आदिवासी क्षेत्रातील युवकास एक दिव्य असते. त्यांच्या निरनिराळ्या मुक्त कृषी संलग्न वातावरणाला आणि ग्रामीण संस्कृतीला तो पारखा होतो, कंटाळतो. त्यात नित्याच्या गैरसोयीची भर पडते आणि कधी गावी परत फिरू असे त्याला होऊन जाते. प्रशिक्षणासाठी आणि कौशल्यप्राप्तीसाठी बैठक लागते, चिकाटी लागते, मानेवर खडा ठेवून काम करावे लागते. यालाही आमच्या आदिवासी ग्रामीण युवकांची मनाने तयारी नसते. कारण ते विमुक्त ग्रामीण कृषी संस्कृतीत वाढलेले असतात. त्यांना कंपनीतील उद्योजकता कराव्या लागणाऱ्या सलग आठ-आठ तास कामाचे वळण नसते. त्यामुळे मनापासून प्रशिक्षण घेणे व त्यातून कौशल्य प्राप्त करून घेणे त्यांना सहज शक्य व सुसह्य होत नाही. उलट जिकिरीचे होते. शिवाय या कालावधीत मिळणाऱ्या तुटपुंजा स्टायपेंड पुरेसा होत नाही. केवळ विद्यावेतनावर भागत नाही. त्यामुळे, बरेचसे अर्धवट प्रशिक्षण सोडतात आणि नागरी संस्कृतीत अर्धवट सामील होतात. ग्रामीण जीवनात रमत नाहीत आणि नागरी जीवनात जमत नाही. अशी स्थिती होते.

उद्योजकतेसाठी लागणाऱ्या वृत्तीचा अभाव

समजा बकेचे कर्ज घेऊन, सिकॉम किंवा महाराष्ट्र राज्य वित्तीय मंडळाचे (महावित्त) विशेष अनुदान घेऊन काही छोटा मोठा उद्योग सुरू केला तरी आदिवासींना आपल्या परंपरा, सणवार, संस्कृती जपणे स्वाभाविक महत्वाचे वाटते. त्यामुळे उद्योगप्रियता आणि सतत अहोरात्र न थांबता जे कष्ट उद्योग उभारताना प्रारंभी अपेक्षित असतात, तो ते करू शकत नाही. तो स्वतः सतत जमेल असे काम करू इच्छितो. स्वयंशासनाची सवय नाही, कुणीतरी आपल्याकडून मुकादमी करून काम करून घेण्याची सवय अंगवळणी पडलेली, त्यामुळे बेसावध राहतो शेवटी स्वतंत्र उद्योगापेक्षा रोजंदारीची नोकरी बरी, कर्ज-व्याज फुगते, खर्च भागत नाही कारण अपेक्षित उत्पादन नाही. शेवटी घेतलेली मशीन विकायची तयारी असते.

खरेदी-विक्री व्यवस्थेचे अज्ञान

आपल्याला लागणारा कच्चा माल किफायतशीरपणे आदिवासी क्षेत्रात कोण पुरवू शकेल, पोहोच देईल. कोणत्या प्रमाणात खरेदी केली तर ते विशेष भावशीर होईल याचे ज्ञान नसते. कोठून, कधी खरेदी करावी. पत नसल्याने कोणी उधार देईल काय हे सगळेच आदिवासी क्षेत्रातील उद्योजकांच्या पुढे प्रश्न असतात. बरं आयात उत्पादन एवढ्या अडीअडचणीतून जरी त्याने तयार केली तरी "जाहिरात कला" ही कलियुगातील १५ वी विद्या त्याला पारखी असते. तयार केलेला माल खपवायचा कसा? कोण मोठ्या प्रमाणावर खरेदी करणार? घाऊक विक्री व्यवस्था नाही. वाहतूक खर्च वाचविण्याचे कौशल्य अवगत नाही. आपली तयार केलेली वस्तू ओरडून विकण्याची फिरून विकण्याचा संकोच वाटतो. अशा परिस्थितीत ज्याला आयात मार्केटिंग म्हणतो त्यांची सांगड घालणे जमत नाही. शासनाकडून, आदिवासी विविध मंडळांकडून एका मर्यादेपलीकडे हातभार लागत नाही आणि त्यांना विशिष्ट मर्यादेतच असे सहकार्य देणे शक्य असते. परिणामी माल उठत नाही. गोडाऊनमध्ये पडून राहतो आणि उद्योजकातील धमक खचू लागते.

चिकाटीनेच उद्योजकता वाढेल

आदिवासी क्षेत्रात स्त्रियांनी नाउमेद न होता केवळ नोकरी व्यवसाय मार्गदर्शन केंद्रात नावे नोंदवून स्वस्थ न बसता मोठ्या जिद्दीने आणि चिकाटीने, अशक्य काही नाही असे समजून उद्योजकता वाढविली पाहिजे. फार तर त्यासाठी एखादी पिढी खर्ची पडते, पण मग पुढच्या अनेक पिढ्यांचा मार्ग सुकर होतो. "पंगुम् लंघयते गिरिम्" म्हटले जाते ते याच प्रयत्नांच्या बळावर म्हणून वरील समस्यांवर मात करूनच दाखवावे. समस्या सोडवतो त्याला युवक म्हणतात.

महाराष्ट्रातील आदिवासी स्त्री साक्षरता

श्री. एम. बी. सुराणा,
उपसंचालक,
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे–१.

आठव्या पंचवार्षिक योजनेत दुर्बल घटकांच्या विकासाकडे अधिक लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले आहे. दुर्बल घटकांमध्ये अनुसूचित जाती, जमाती व महिलांचा समावेश आहे. या दुर्बल घटकांमध्ये सर्वाधिक अविकसित घटक कोणते आहेत हे शोधून काढून त्यावर लक्ष केंद्रित करणे ही आजची गरज आहे. अनुसूचित जमातीत महिलांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अत्यल्प म्हणजे नगण्यच आढळते, म्हणून. आदिवासी महिलांच्या साक्षरतेच्या प्रश्नाकडे लक्ष केंद्रित करण्याची आजची खरी गरज आहे.

महाराष्ट्राची १९८१ च्या जनगणनेनुसार सर्वसाधारण साक्षरता ४७ टक्के आहे, तर ती आदिवासींमध्ये फक्त २२ टक्के आढळते. सर्वसाधारण साक्षरतेपेक्षा निम्म्याहूनही ती कमी आहे. आदिवासींमधील स्त्री-साक्षरतेचा विचार केला तर सर्वसाधारण स्त्री साक्षरतेपेक्षा फारच कमी आहे. सर्वसाधारण स्त्री-साक्षरता ३५ टक्के आहे. तर आदिवासी स्त्री साक्षरता फक्त ११ टक्के आहे. या ११ टक्क्यामध्ये अनौपचारिक शिक्षण Informal Education घेतलेल्या व केवळ शाळेत नाव दाखल केलेल्या स्त्रियांची संख्या बरीच मोठी आहे.

आदिवासी स्त्री-साक्षरता व सर्वसाधारण स्त्री-साक्षरता यांत फार मोठी तफावत असण्याची कारणे खालीलप्रमाणे देता येतील.

१. आदिवासी ज्या भागात राहतात त्या भागाचा विकसनशील भागाशी येणारा तुटपुंजा संबंध.

२. आदिवासींची आर्थिक परिस्थिती.

३. आदिवासी क्षेत्रात असलेल्या शिक्षणाच्या अपुऱ्या सोई.

४. आदिवासी स्त्री-शिक्षणाबद्दल अनास्था व जागृतीचा अभाव.

वरील सर्व बाबींमुळे आदिवासींच्या स्त्रियांच्या साक्षरतेवरच मोठ्या प्रमाणात परिणाम झालेला आहे. काही जिल्ह्यात आदिवासी स्त्री साक्षरतेचे प्रमाण ५ टक्क्याहून कमी आढळते. मुंबई, पुणे, नागपूर, व मोठ्या शहरातील आदिवासी स्त्रियांची साक्षरता वगळली तर राहिलेल्या सर्व भागात हे प्रमाण ७ ते ८ टक्क्यांहून कमीच आहे. यावरून असे स्पष्ट होते की, १०० आदिवासी स्त्रियांपैकी ९२ आदिवासी स्त्रिया ह्या निरक्षर आहेत. या दुर्लक्षिलेल्या घटकात बदल घडवून आणणे जरूरीचे आहे.

आदिवासींमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढावे या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने आदिवासी मुले-मुलींसाठी आश्रमशाळा काढल्या आहेत. वसतीगृहे सुरू केलीत. त्यामुळे पुरुष साक्षरता वाढली परंतु स्त्री-साक्षरतेमध्ये म्हणावी तशी वाढ झालेली आढळली नाही.

स्त्री हे समाज रचनेतील महत्त्वाचे अंग व घटक आहे. तिच्या प्रगतीशिवाय समाजाची पर्यायाने देशाची प्रगती होणार नाही हे महात्मा ज्योतिबा फुले यांनी फार पूर्वीच सांगितले आहे. यासाठी त्यांनी पुण्यात स्त्रियांची प्रथम शाळा सुरू केली. त्याचप्रमाणे महाराष्ट्रात महर्षी धोंडोपंत कर्वे यांनी स्त्री-शिक्षण संस्था काढून महाराष्ट्रातील स्त्रियांना शिक्षणक्षेत्रामध्ये पुढे आणण्याचा मोठा प्रयत्न केला. अशा प्रगत व शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असणाऱ्या महाराष्ट्र राज्यात मात्र आदिवासी स्त्री-शिक्षणाची अशी स्थिती आहे, हे भूषणावह नाही.

आदिवासी स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण वाढावे. ज्या भागात हे प्रमाण अत्यल्प आहे, अशा तालुक्यात/जिल्ह्यात आदिवासी शिक्षणासाठी विशेष कार्यक्रम राबवावा या उद्देशाने महाराष्ट्र राज्यातील ६ टक्क्यांपेक्षा आदिवासी स्त्री-साक्षरता कमी असलेल्या जिल्ह्याची व तालुक्यांची माहिती संकलित केली आहे. ती सोबतच्या तक्त्यात देण्यात आली आहे.

या माहितीचे पृथकरण केले असता खालील बाबी दृष्टोत्पत्तीस येतात.

१. महाराष्ट्र राज्यातील संपूर्ण जिल्ह्यांचा एकत्रित विचार केला तर ठाणे, औरंगाबाद, परभणी जिल्ह्यातील आदिवासी स्त्रियांचे साक्षरतेचे प्रमाण ६ टक्क्याहून कमी आढळते. या ३ जिल्ह्यांपैकी ठाणे जिल्ह्यात आदिवासी स्त्रियांची संख्या फार मोठी आहे.

२. महाराष्ट्र राज्यातील ६२ तालुक्यांमध्ये, आदिवासी स्त्रीसाक्षरता ६ टक्क्यापेक्षा कमी आढळते. त्यात प्रामुख्याने ठाणे, धुळे, नाशिक, जळगाव, रायगड, अमरावती, चंद्रपूर, (गडचिरोली), नांदेड, बीड, परभणी औरंगाबाद व अहमदनगर इत्यादी १४ जिल्ह्यांतील तालक्यांचा समावेश आहे. या ६२ तालुक्यांपैकी १४ तालुके उपयोजना क्षत्रातील व ४८ तालुके उपयोजना क्षेत्राबाहेरील आहेत.

सोबत जोडलेली आदिवासी स्त्री-साक्षरतेची सांख्यिकीय माहिती नियोजनासाठी, संशोधनासाठी व या क्षेत्रात काम करणाऱ्यांना उपयुक्त होईल, अशी अपेक्षा आहे.

आदिवासी स्त्रीयांमध्ये ६ टक्केपेक्षा साक्षरतेचे कमी प्रमाण असलेले महाराष्ट्र राज्यातील जिल्हे व तालुके व त्यांची यासंबंधीची आकडेवारी

(ग्रामीण क्षेत्र फक्त)

अ. नं.	जिल्हा	तालुका/ जिल्हा		एकूण आदिवासी	एकूण आदिवासी स्त्रिया	आदिवासी साक्षर स्त्रिया	स्त्री साक्षरतेचे शेकडा प्रमाण
१	२	३		४	५	६	७
		(अ) जिल्हे					
१	ठाणे		..	६,९२,७२२	३,४३,१३२	१८,३५७	५.३५
२	परभणी		..	७४,७२३	३६,८४५	१,४६७	३.९८
३	औरंगाबाद (जालना)		..	७१,१६४	३५,२०४	१,४२६	४.०५
		(ब) तालुके :—					
१	ठाणे	१ डहाणू	..	१,४३,५४७	७१,५१०	२,३७५	३.३२
		२ तलासरी	..	६०,८६३	३१,०८२	१,०५७	३.४०
		३ जव्हार	..	९२,४३३	४६,६३७	२,०१२	४.३१
		४ शहापूर	..	५३,१०३	२५,७८७	१,०८७	४.२२
		५ मुरबाड	..	२६,८४८	१३,०९५	७१८	५.४८
२.	नासिक	६ मालेगाव	..	३९,२१४	१९,४२४	८७८	४.५२
		७ चांदवड	..	१७,७००	८,८५६	४१२	४.६५
		८ नांदगाव,	..	१४,६४९	७,३०१	२७५	३.७६
		९ येवला	..	९,१४८	४,५३३	१८६	४.१०
३.	धुळे	१० धुळे	..	४६,७९८	२३,१३९	१,१०७	४.७८
		११ अक्कलकुवा	..	८७,४१९	४३,९९३	२,१४२	४.८६
		१२ अक्राणी (धडगाव)	..	६०,२६९	३०,२०८	६५६	२.१७
		१३ शहादा	..	१,०७,९७०	५३,६०२	२,४३३	४.५३
		१४ शिरपूर	..	७७,२५७	३७,९७३	२,०२०	५.३१
४	जळगाव	१५ चाळीसगाव	..	१९,२५०	९,४६९	५२६	५.५५
		१६ भडगाव	..	११,६२६	५,७५२	२९०	५.०४
		१७ पारोळा	..	११,३३३	५,५२७	१९१	३.४५
		१८ एरंडोल	..	१८,१७५	८,९५६	४२८	४.७७
५	अहमदनगर	१९ पारनेर	..	६,९३०	३,४३२	१६०	४.६६
		२० कोपरगाव	..	२०,२२७	९,९४०	५४३	५.४६
६.	रायगड	२१ खालापूर	..	१५,२६३	७,३५७	२३५	३.१९
		२२ पेण	..	१७,६२७	८,७०१	२०६	२.३६
		२३ सुधागड	..	८,९१२	४,४६८	६५	१.४५
		२४ माणगाव	..	११,७२७	५,९०५	२८५	४.८२
		२५ महाड	..	६,१५१	२,९५४	१३७	४.६३
		२६ पोलादपूर	..	१,९३१	९६६	३८	३.९३

अ. क्र.	जिल्हा	तालुका/जिल्हा		एकूण आदिवासी	एकूण आदिवासी स्त्रिया	आदिवासी साक्षर स्त्रिया	स्त्री साक्षरतेचे शेकडा प्रमाण
१	२	३		४	५	६	७
७	नांदेड	२७ देगलूर	..	९,८१६	४,८४२	२५४	५.२४
८	अमरावती	२८ धारणी	..	१,०५,६८६	५२,३०१	२,३१७	४.४३
		२९ चिखलदरा					
९	चंद्रपूर	३० सिरोंचा	..	९४,६३२	४६,४६१	१,३४९	२.९०
		३१ अहेरी					
		३२ एटापल्ली					
१०	औरंगाबाद	३३ खुलदाबाद	..	३,३८२	१,६४६	५२	३.१५
		३४ कन्नड	..	१०,६६३	५,२६२	२३१	४.३८
		३५ सोयगाव	..	६,१७५	३,०२४	१३३	४.३९
		३६ सिल्लोड	..	१३,७२६	६,८३३	२३०	३.३६
		३७ भोकरदन	..	६,७०५	३,२९४	११९	३.६१
		३८ जालना	..	३,९५१	१,९७९	३८	१.९२
		३९ अंबड	..	५,२०१	२,५८६	१२६	४.८७
		४० पैठण	..	३,८००	१,८९४	१०१	५.३३
		४१ गंगापूर	..	५,०९७	२,५३३	११५	४.५४
		४२ वैजापूर	..	७,०१९	३,५२३	११९	३.३७
११	परभणी	४३ जिंतुर	..	८,८५४	४,३८८	१३८	३.१४
		४४ हिंगोली	..	१३,१६४	६,५६६	२७८	४.२३
		४५ कळमनुरी	..	३०,०२१	१४,७३६	४३३	२.९३
		४६ बसमत	..	१०,०७७	४,९६७	२१८	४.३८
		४७ गंगाखेड	..	३,६००	१,७४०	७९	४.५४
		४८ पाथरी	..	१,९४७	९५३	३७	३.८८
१२	बीड	४९ बीड	..	१,०५६	५१५	२४	४.६६
		५० गवराई	..	१,८४३	८९२	३९	४.३७
		५१ माजलगांव	..	२,१५६	१,०४६	५४	५.१६
		५२ आष्टी	..	२,४७९	१,२१७	५७	४.६८
१३	कोल्हार	५३ बावडा	..	१,६९८	७७४	१८	२.३२
१४	रत्नागिरी	५४ रत्नागिरी	..	८६५	४१६	६	१.४४
		५५ गुहागर	..	७३०	३५८	९	२.५१
		५६ खेड	..	४,२३०	१,९७६	३४	१.७२
		५७ चिपळूण	..	३,४१२	१,६१८	११	०.६७
		५८ संगमेश्वर	..	२,०७४	९९७	३	०.३०
		५९ लांजा	..	१,९५८	९२५	१	०.१०
		६० राजापूर	..	२,२३७	१०४०	५	०.४८
		६१ मालवण	..	१,३६६	६५९	३४	५.१५
		६२ देवगड	..	१,२५२	५९२	१	०.१६

साधन :— 'जनगणना' १९८१ वर आधारित

आदिवासी उप-योजना क्षेत्रातील आदिवासी स्त्रियांचे शिक्षण

-- जॉन गायकवाड*

जीवनात शिक्षणास अनन्यसाधारण असे महत्त्वाचे स्थान आहे. शिक्षणामुळे नियोजित सामाजिक बदलाच्या (planned social change) प्रक्रियेबरोबर विकासासही गती मिळते. शैक्षणिक गुणवत्तेचा व्यक्तीस व त्याच्या कुटुंबियांस होणाऱ्या फायद्याबरोबर समाजासही निश्चितच फायदा होऊ शकतो. कारण शिक्षणामुळे अधिक कसदार व अधिक कार्यक्षम असे मानवी भांडवल निर्माण होते.

आदिवासी भागात शिक्षणाची पहाट होऊन काही फार काळ लोटलेला नाही. समोर डोंगरासारख्या अडचणी असूनसुद्धा त्या अडचणींकडे कधी पाठ फिरवून तर कधी त्या अडचणींना सामोरे जाऊन आज आदिवासींमध्ये साक्षरतेची जी वाटचाल होत आहे ती स्फूर्तिदायक व आशादायक ठरावी अशीच आहे.

या लेखामध्ये आदिवासी स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण व आदिवासी उपयोजनांतर्गत क्षेत्रात मुलींच्या शैक्षणिक वाटचालीबद्दलचे विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे.

१. तुलनात्मक साक्षरतेचे प्रमाण (१९६१–१९७१–१९८१)

कोष्टक क्र. १

सर्वसाधारण लोक व आदिवासी लोक यांच्यातील (१९६१–७१–८१) या दोन दशकातील तुलनात्मक साक्षरतेचे प्रमाण.

वर्ष	सर्वसाधारण		
	एकूण	पुरुष	स्त्रिया
१९८१	४७.०२	५८.६५	३४.६३
१९७१	३९.१३	५१.०४	२६.४३
१९६१	२९.८२	४२.०४	१६.७६
	आदिवासी		
	एकूण	पुरुष	स्त्रिया
	२२.२९	३२.३८	११.९४
	११.७४	१९.०६	४.२१
	७.२१	१२.५५	१.७५

(संदर्भ : 'आदिवासी संशोधन पत्रिका' सप्टेंबर १९८३)

कोष्टक क्र. १ मध्ये असे दिसून येते की, सर्वसाधारण लोकांमध्ये १९६१ साली जे साक्षरतेचे प्रमाण होते, त्या प्रमाणापर्यंत आदिवासी लोक अद्यापपर्यंत येऊ शकलेले नाहीत व त्याचप्रमाणे स्त्रियांच्या साक्षरतेच्या प्रमाणाबाबतही हेच दिसून येते.

२. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जिल्हानिहाय साक्षरतेचे प्रमाण (१९८१)

कोष्टक क्र. २

अनुसूचित जमातीच्या स्त्रियांच्या (आदिवासी उपयोजना क्षेत्रातील) जिल्हानिहाय साक्षरतेच्या प्रमाणाची, अनुक्रमे (१) अनुसूचित जमातींचे पुरुष व (२) सर्वसाधारण स्त्रिया–यांच्यातील साक्षरतेच्या प्रमाणाची तुलना.

जिल्हा	पुरुष अनुसूचित जमाती	स्त्रिया सर्वसाधारण	स्त्रिया अनुसूचित जमाती
	१	२	३
रायगड	२३.३५	३४.२७	९.३६
ठाणे	२२.३४	४०.१५	६.२९
नाशिक	२५.२४	३१.८५	८.०५
धुळे	२३.७४	२६.०१	६.७२
जळगाव	३०.५९	३४.३९	८.९८
अहमदनगर	२६.५१	२९.२४	७.११
पुणे	४०.२१	४२.१४	१४.७८
नांदेड	३३.२९	१५.६७	७.४२
अमरावती	३४.३७	४२.५५	१६.५९
यवतमाळ	३५.४९	२६.८६	१२.९६
नागपूर	५३.९४	४४.६२	३०.६२
भंडारा	४८.४७	२९.४९	१७.९९
गडचिरोली चंद्रपूर	३३.१०	२२.२२	११.२८

(संदर्भ : 'आदिवासी संशोधन पत्रिका' मार्च१९८४).

कोष्टक क्रमांक २ वरून असे दिसून येईल की, सर्वसाधारण स्त्रिया व अनुसूचित जमातीच्या स्त्रिया यांच्या साक्षरतेच्या प्रमाणात दखल घेण्याइतपत तफावत आहे. त्याचप्रमाणे अनुसूचित जमातीच्या पुरुषांमध्ये व स्त्रियांमध्येसुद्धा साक्षरतेच्या प्रमाणात तफावत दिसते.

* अधिव्याख्याता, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

३. आदिवासी उपयोजनांतर्गत क्षेत्रातील शिक्षण

आदिवासी मुलींची टप्पेवार पटसंख्या व टक्केवारी (१९७९–८० ते १९८२–८३)

कोष्टक क्रमांक ३

इयत्तावार टप्पे	वर्षे	(१९७९-८०)	मुलींची टक्केवारी	(१९८१–८२)	मुलींची टक्केवारी	(१९८१-८२)	मुलींची टक्केवारी	(१९८२-८३)	मुलींची टक्केवारी
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१ ली -५ वी पटावरील एकूण विद्यार्थी	१.	४,६१,२३८		४,७१,९८४		५,०६,७०२		५,२४,,४३५	
पटावरील मुली	२.	१,७८,८२७	(३९)	१,८४,६४५	(३१)	२,००,६२८	(४०)	२,१०,९२८	(४०)
६ वी-८ वी	१	६३,४०७		६८,६०५		८३,०४७		९०,४०७	
	२.	१९,३४०	(३१)	२१,०८५	(३१)	२५,५३७	(३१)	२८,४५३	(३१)
९ वी-१० वी	१.	१८,६३३		१९,९१४		२६,१००		३०,१००	
	२.	५,०८७	(२७)	५,२९३	(२७)	६,९६९	(२७)	७,९८१	(२७)
११ वी-१२ वी	१.	३,६३९		४,६२९		६,१०३		७,००९	
	२.	८१५		१,०६५	(२३)	१,४८३	(२४)	१,६००	(२३)
१ वी-१२ वी	१.	५,४६,९७७		५,६५,१३२		६,२१,९५२		६,५१,५५१	
	२.	२,०४,०६९	(३७)	३,१२,०८८	(३८)	२,३४,६१७	(३८)	२,४८,९६२	(३८)

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जिल्हानिहाय अनुसूचित जमातीच्या स्त्रियांच्या साक्षरतेच्या प्रमाणाचा विचार केल्यास व त्यांचे साक्षरतेचे प्रमाण जिल्हानिहाय उतरत्या क्रमाने लावल्यास, संबंधित जिल्ह्यांसाठी हे चित्र अधिक स्पष्ट होईल.

सह्याद्री विभाग

पुणे (१४.७८), रायगड (९.३६), जळगाव (८.९८), नाशिक (८.०५), अहमदनगर (७.११), धुळे (६.७२), व ठाणे (६.२९).

गोंडवन विभाग

नागपूर (३०.६२), भंडारा (१७.९९), अमरावती (१६.५९), यवतमाळ (१२.९६) गडचिरोली व चंद्रपूर (११.२८) व नांदेड (७.४२).

सर्व १४ जिल्ह्यांचा विचार केल्यास हे चित्र असे दिसेल :

–नागपूर, भंडारा, अमरावती, पुणे, यवतमाळ, गडचिरोली व चंद्रपूर, रायगड, जळगाव, नाशिक, नांदेड, अहमदनगर, धुळे व ठाणे.

कोष्टक क्रमांक ३ मध्ये १ ली ते १२ वी इयत्तांची विभागणी चार टप्प्यांमध्ये केलेली आहे.

पहिला टप्पा : इयत्ता १ ली ते ५ वी

सन १९७९–८० ते १९८०–८१ या दोन वर्षे पटावरील मुलींची टक्केवारी ३९ इतकी होती. पुढील वर्षी ही टक्केवारी १ ने वाढली व सन १९८१–८२ ते १९८२–८३ या दोन वर्षांसाठी ही टक्केवारी ४० इतकी होती.

दुसरा टप्पा : इयत्ता ६ वी ते ८ वी

या टप्प्यांमध्ये, १९७९–८० ते १९८२-८३ या चार वर्षांच्या कालावधीत पटावरील मुलींची टक्केवारी ३१ वर स्थिर आहे.

तिसरा टप्पा : इयत्ता ९ वी ते १० वी

या टप्प्यांमध्ये संदर्भातील चार वर्षांच्या कालावधीत पटावरील मुलींची टक्केवारी २७ वर स्थिर आहे.

चौथा टप्पा : इयत्ता ११ वी ते १२ वी

संदर्भातील पहिल्या वर्षी पटावरील मुलींची टक्केवारी २२ होती. पुढील दोन वर्षे दरवर्षी ही टक्केवारी १ ने वाढली व चौथ्या वर्षी, तिसऱ्या वर्षी, असलेली टक्केवारी १ ने घटली, म्हणजे १९८१–८३ मध्ये पटावरील मुलींची टक्केवारी २३ होती.

१ ली ते १२ वी असा समग्र विचार केल्यास असे दिसून येईल की, सदर्भातील चार वर्षाच्या कालावधीत पहिल्या वर्षी, पटावरील मुलींची टक्केवारी ३७ होती. पुढील वर्षी या टक्केवारीमध्ये १ ने वाढ झाली व शेवटच्या तीन वर्षासाठी ही टक्केवारी ३८ वर स्थिर होती.

चार वर्षांच्या कालावधीतील टप्पेवार पटावरील मुलींच्या टक्केवारीचा समग्र विचार केल्यास–

कोष्टक क्र. ४

टप्पा	पटावरील मुलींची टक्केवारी
पहिला	३९–४० या दरम्यान
दुसरा	३१
तिसरा	२७
चौथा	२२–२४ या दरम्यान

कोष्टक क्रमांक ४ मध्ये असे दिसून येईल की, पहिला–दुसरा, दुसरा–तिसरा व तिसरा–चौथा या टप्प्यांच्या संदर्भात पटावरील मुलींच्या टक्केवारीत टप्पेवार घट दिसून येते.

(केवळ मुलींची संख्या घटते एवढेच नव्हे तर एकूण विद्यार्थी संख्येतही कमालीची टप्पेवार घट दिसून येते).

स्तरनिहाय पटावरील मुली व त्यांची टक्केवारी (१९७९–८० ते ८२–८३)

प्राथमिक स्तर : कोष्टक क्र. ५

	संस्थांची संख्या	पटावरील एकूण विद्यार्थी.	पटावरील मुली	मुलींची टक्केवारी
	१	२	३	४
प्राथमिक शिक्षण				
(अ) एक शिक्षकी शाळा				
(१) १९७९–८०	३४११	१,२४,५४६	४७,७३०	३८
(२) १९८०–८१	३४८८	१,२५,९५७	४९,३२६	३९
(३) १९८१–८२	३५३५	१,२८,२९२	५१,००२	४०
(४) १९८२–८३	३६२०	१,३२,७३६	५४,८०६	४१
(ब) कनिष्ठ प्राथमिक शाळा				
(१) १९७९-८०	१२५१	१,५२,२१०	६१,०६८	४०
(२) १९८०-८१	१३७२	१,६५,०६०	६६,८७७	४१
(३) १९८१-८२	१४५९	१,७८,१०५	७४,४२६	४२
(४) १९८२-८३	१६००	१,८९,४४९	७९,१७५	४२
(क) वरिष्ठ प्राथमिक शाळा				
(१) १९७९-८०	९८०	२,०५,८५७	७६,९५५	३७
(२) १९८०-८१	९६३	२,०५,११६	७६,२०२	३७
(३) १९८१-८२	९८६	२,२०,३९५	८१,८४७	३७
(४) १९८२-८३	९८८	२,२१,६४३	८३,९८१	३८
एकूण प्राथमिक शाळा				
(१) १९७९-८०	५६६२	४,८२,६१३	१,८५,७५३	३८
(२) १९८०-८१	५८२३	४,९६,१३३	१,९२,४०५	३९
(३) १९८१-८२	५९८०	५,२६,७९२	२,०७,२७५	३९
(४) १९८२-८३	६२०८	५,४३,८३८	२,१७,९६२	४०

स्तरनिहाय पटावरील मुली व त्यांची टक्केवारी त्याचप्रमाणे शैक्षणिक संस्थांमधील शिक्षिका व त्यांची टक्केवारी (१९७९-८० ते १९८२-८३).

प्राथमिक शिक्षण

(अ) एक शिक्षकी शाळा

सन १९७९-८० ते १९८२-८३ या चार वर्षामध्ये या शाळांची संख्या वाढली आहे व त्याचबरोबर या शाळांमधील पटावरील मुलींची टक्केवारी १९७९-८० साली ३८ होती, ती दरवर्षी १ टक्का इतकी वाढून या १९८२-८३ साली ४१ टक्के इतकी झाली.

(ब) कनिष्ठ प्राथमिक शाळा

सन १९७९-८० ते १९८२-८३ या चार वर्षांमध्ये या शाळांची संख्या वाढली आहे व त्याचबरोबर या शाळांमधील मुलींची टक्केवारी १९७९-८०, १९८१-८२ या दरम्यान दरवर्षी १ टक्का वाढून ४१ टक्क्यांवरून ४२ टक्के इतकी झाली व १९८१-८२, १९८२-८३ या दोन वर्षांमध्ये पटावरील मुलींची टक्केवारी ४२ वर स्थिर आहे.

(क) वरिष्ठ प्राथमिक शाळा

सन १९८०-८१ मध्ये या शाळांची संख्या घटलेली दिसते, परंतु एकंदरीत सन १९७९-८० ते १९८२-८३ या चार वर्षाच्या कालावधीत केवळ ८ शाळा वाढलेल्या दिसतात. या शाळांमधील पटावरील मुलींची टक्केवारी १९७९-८० ते १९८१-८२ या दोन वर्षांमध्ये ३७ टक्क्यांवर स्थिर होती व १९८२-८३ या वर्षी ही टक्केवारी ३८ पयन्त गेलेली दिसून येते.

एकूण प्राथमिक स्तराचा विचार केल्यास असे दिसून येईल की, १९७९-८० ते १९८०-८१ या कालावधीत पटावरील मुलींची टक्केवारी ३८ वरून ३९ वर गेली. १९८०-८१ ते १९८१-८२ ही दोन वर्षे पटावरील संख्या ३९ वर स्थिर राहिली व १९८२-८३ साली ही टक्केवारी ४० वर गली.

स्तरनिहाय पटावरील मुली व त्यांची टक्केवारी (१९७९-८० ते १९८२-८३)

माध्यमिक स्तर : कोष्टक क्रमांक ६

	संस्थांची संख्या	पटावरील एकूण विद्यार्थी	पटावरील मुली	मुलींची टक्केवारी
	१	२	३	४
माध्यमिक शिक्षण :				
(अ) माध्यमिक शाळा				
(१) १९७९-८०	१७४	५२,४९५	१५,६५३	३०
(२) १९८०-८१	१६४	५६,३५२	१६,९८५	३०
(३) १९८१-८२	२३१	७०,९९७	२१,१००	३०
(४) १९८२-८३	२३५	८०,९१२	२४,०५८	३०
(ब) उच्च माध्यमिक शाळा				
(१) १९७९-८०	२०	१७,९२४	६,०१९	३४
(२) १९८०-८१	२५	१९,९७४	६,७४०	३४
(३) १९८१-८२	३३	३०,६९६	१०,२३७	३३
(४) १९८२-८३	३५	३३,७३७	११,१२५	३३
एकूण माध्यमिक शाळा				
(१) १९७९-८०	१९४	७०,४१९	२१,६७२	३१
(२) १९८०-८१	१८९	७६,३२६	२३,७२५	३१
(३) १९८१-८२	२६४	१,०१,६९३	३१,३३७	३१
(४) १९८२-८३	२७०	१,१४,६४९	३५,१८३	३१

स्तरनिहाय पटावरील मुली व त्यांचीटक्केवारी १९७९-८० ते १९८२-८३

उच्च स्तर : कोष्टक क्र. ७

	संस्थांची सख्या	पटावरील एकूण विद्यार्थी	पटावरील मुली	मुलींची टक्केवारी
	१	२	३	४
उच्च शिक्षण				
(१) १९७९-८०	७	२,८७४	५०८	१८
(२) १९८०-८१	७	३,९०७	६६१	१७
(३) १९८१-८२	९	४,५२०	८२६	१८
(४) १९८२-८३	११	५,३७३	९९२	१८
बी. एड. महाविद्यालय				
(१) १९७९-८०	१	१२८	१५	१२
(२) १९८०-८१	१	१२९	२३	१८
(३) १९८१-८२	१	९८	१८	१८
(४) १९८२-८३	१	११७	१८	१५
आयुर्वेद महाविद्यालय				
(१) १९७९-८०	१	९७	३	३
(२) १९८०-८१	१	११०	८	७
(३) १९८१-८२	१	१२०	१४	१२
(४) १९८२-८३	१	१३१	१६	१२

उच्च शिक्षण

कला/शास्त्र/वाणिज्य महाविद्यालये

१९७९-८० ते १९८२-८३ या चार वर्षांच्या कालावधीत आदिवासी उपयोजनांतर्गत क्षेत्रात या महाविद्यालयांची संख्या ७ वरून ११ वर गेली असली तरी या महाविद्यालयांमध्ये मुलींची टक्केवारी १८ वर स्थिर आहे.

माध्यमिक शिक्षण

(अ) माध्यमिक शाळा

१९७९-८० साली होत्या त्यापेक्षा १९८०-८१ साली या शाळांची संख्या घटलेली दिसते; परंतु एकंदरीत १९७९-८० ते १९८२-८३ या चार वर्षांमध्ये या शाळा १७४ वरून २३५ पर्यन्त वाढलेल्या दिसतात.

चार वर्षांच्या कालावधीत शाळांची संख्या वाढली असली तरी पटावरील मुलांची टक्केवारी ३० वरच स्थिरावलेली दिसते.

(ब) उच्च माध्यमिक शाळा

या शाळांची संख्या चार वर्षांच्या कालावधीत २० वरून ३५ पर्यन्त गेलेली दिसते.

पहिली दोन वर्षे पटावरील मुलींची टक्केवारी ३४ वर स्थिर असून १९८१-८२ मध्ये ही टक्केवारी ३३ वर येऊन १९८१-८२ व १९८२-८३ या वर्षासाठी ती ३३ वर स्थिरावलेली दिसते.

(उच्च माध्यमिक शाळांतील पटावरील मुलींची टक्केवारी माध्यमिक शाळांमधील पटावरील मुलींच्या टक्केवारीपेक्षा थोडीशी अधिक असली तरी उच्च माध्यमिक शाळांची संख्या कमी झाल्याबरोबरच पटावरील एकूण विद्यार्थी कमी होऊन मुले अधिक प्रमाणात कमी होऊन मुलींची टक्केवारी वाढलेली आहे असे म्हणता येईल).

एकूण माध्यमिक स्तराचा विचार केल्यास असे दिसून येईल की, १९७९-८० ते १९८२-८३ या चार वर्षांच्या कालावधीत माध्यमिक शाळांची १९४ वरून २७० पर्यन्त वाढ होऊनसुद्धा पटावरील मुलांची टक्केवारी ३१ वर स्थिरावलेली दिसते.

संदर्भ : (कोष्टक क्रमांक ३, ४, ५ व ६) शिक्षण संचालनालय, (महाराष्ट्र राज्य), पुणे-१ यांनी प्रसिद्ध केलेल्या 'शिक्षणावर दृष्टीक्षेप.'

(१९७९-८०, १९८०-८१, १९८१-८२ व १९८२-८३) या चार अंकांमधील आदिवासी उपयोजनांतर्गत क्षेत्रातील शिक्षण यावरून.

बी. एड. महाविद्यालये

महाराष्ट्र राज्यामध्ये आदिवासी उपयोजनांतर्गत क्षेत्रात १९८२-८३ पर्यन्त फक्त एकच बी. एड. महाविद्यालय होते.

या महाविद्यालयात १९७९-८० साली १२ टक्के मुली होत्या, १९८०-८१ व १९८१-८२ ही दोन वर्षे ही टक्केवारी १८ वर स्थिर होती, तर १९८२-८३ साली ही टक्केवारी १५ वर आली.

आयुर्वेद महाविद्यालय

राज्यात आदिवासी उपयोजनांतर्गत क्षेत्रात १९८२-८३ पर्यन्त फक्त एकच आयुर्वेद महाविद्यालय होते. सन १९७९-८० साली या महाविद्यालयामध्ये ३ टक्के मुली होत्या, सन १९८०-८१ मध्ये ही टक्केवारी ७ वर गेली व १९८१-८२ मध्ये ही टक्केवारी १२ पर्यन्त गेली. व १९८२–८३ मध्येसुद्धा तितकीच राहिली.

संदर्भातील चार वर्षांच्या कालावधीतील स्तरपटावरील मुलींच्या टक्केवारीचा समग्र विचार

कोष्टक क्र. ८

स्तर		पटावरील टक्केवारी
प्राथमिक शिक्षण		
कनिष्ठ प्राथमिक	—	४०.
वरिष्ठ प्राथमिक	—	३७
(एकूण प्राथमिक)	—	(३८)
माध्यमिक शिक्षण		
माध्यमिक	—	३०
उच्च माध्यमिक	—	३३
(एकूण माध्यमिक)	—	(३)
उच्च शिक्षण		
कला/वाणिज्य/शास्त्र / सा. आयुर्वेद/बी. एड.		१२

कोष्टक क्रमांक ८ मध्ये असे दिसून येईल की,

(अ) 'कनिष्ठ प्राथमिक' या स्तरावरील पटावरील मुलींची टक्केवारी पुढील सर्व स्तरावर (वरिष्ठ प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शिक्षण) घटत जाते.

(ब) प्राथमिक स्तरावरील पटावरील टक्केवारी (३८–४०) या दरम्यान आहे. माध्य. स्तरावर ही टक्केवारी ३१ वर स्थिर आहे. इतर स्तरावर ही टक्केवारी साधारणपणे १२–१८ दरम्यान आहे.

(क) इतर स्तरावर टक्केवारी घटत असता उच्च माध्यमिकमधील पटावरील मुलींची टक्केवारी माध्यमिकमधील याच टक्केवारीपेक्षा अधिक असून संभाव्य कारण कोष्टक क्रमांक ५ च्या विश्लेषणाबाबत दिले आहे.

कोष्टक क्रमांक १ वरून असे दिसून येते की, सर्वसाधारण स्त्रियांमध्ये १९६१ साली जे साक्षरतेचे प्रमाण होते त्या प्रमाणापर्यन्त आदिवासी स्त्रिया अद्याप येऊ शकलेल्या नाहीत; परतु त्यांच्यातील साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे ही एक समाधानाची बाबच म्हटली पाहिजे.

कोष्टक क्रमांक २ वरून असे दिसून येईल की, साधारण स्त्रिया व अनुसूचित जमातीच्या स्त्रिया यांच्या साक्षरतेच्या प्रमाणात दखल घेण्याइतपत तफावत आहे.

कोष्टक क्रमांक ३ व ४ वरून असे दिसून येते की, पहिला-दुसरा, दुसरा-तिसरा व तिसरा –चौथा या टप्प्यांच्या संदर्भात पटावरील मुलींच्या टक्केवारीत टप्पेवार घट दिसून येते.

कोष्टक क्रमांक ५, ६, ७ व ८ वरून असे दिसून येते की, प्राथमिक स्तरावरील पटावरील मुलींची टक्केवारी पुढील सर्व स्तरांवर (म्हणजे माध्यमिक व उच्च) घटत जाते.

वरील विवेचनावरून असे दिसून येईल की, आदिवासी उपयोजनांतर्गत क्षेत्रामध्ये औपचारिक शिक्षणाद्वारे जवळजवळ ४० टक्के मुलींचा साक्षरतेशी परिचय होतो. माध्यमिक स्तरापर्यन्त ही टक्केवारी ३० पर्यन्त येते

सामाजिक, सांस्कृतिक कारणांमुळे मुलींच्या शिक्षणास असलेला पारंपरिक विरोध किंवा अनास्था, त्याचप्रमाणे सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक कारणांमुळे असलेल्या अडचणींचाही मुलीच्या शिक्षणावर विपरीत परिणाम होतो. ही परिस्थिती बदलण्यास काही काळ जावा लागेल. पण तोपर्यन्त नुसते थांबूनही चालणार नाही. साक्षरतेच्या अधिक परिणामकारक प्रसारासाठी व लोकांमध्ये जाणीव जागृती होण्यासाठी, औपचारिक शिक्षणाबरोबरच अनौपचारिक शिक्षण, अशकालीन वर्ग व प्रौढ शिक्षण यावरही अधिक भर दिला पाहिजे.

आदिवासी विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांसाठी स्थितिज्ञान व उद्‌बोधन सत्र

दि. ८ ऑगस्ट ते १९ ऑगस्ट १९८८

सामूहिक चर्चेचा अभ्यास-गट-निहाय गोषवारा

अभ्यासगट क्र. १

विषय : नियोजन अर्थसंकल्प व संनियंत्रणा-बाबतची आदिवासी उपाययोजनेच्या संदर्भात सध्याची पद्धत समाधानकारक आहे काय? ती समाधानकारक नसल्यास सुधारण्यासाठी काय सूचना आहेत ?

सभासद—

सर्वश्री. व्ही. ए. नाईक

ए. के. बंगाले,

ए. एल. जरड,

एम. एन. आठवले,

ए. एन. परदेशी,

पी. बी. कुबल.

दुर्बल घटकांमध्ये आदिवासी जमात ही अत्यंत दुर्गम भागात वसलेली असून सर्वच दृष्टया मागासलेली आहे. बाहेरील जगातील सुधारलेल्या संस्कृतीशी या जमातीचा फार काळ संबंध न आल्याने बहुतांश लोक द्रारिद्रय रेषेखालील जिणे जगत आहेत. या आदिवासींचा सर्वांगीण विकास व्हावा, तसेच आदिवासी भागात मूलभूत सोई उपलब्ध व्हाव्यात म्हणून ५ व्या पंचवार्षिक योजनेच्या सुरुवातीस आदिवासी उपयोजनेची संकल्पना पुढे आली.

आदिवासी उपयोजनेची ४ उद्दिष्टे आहेत:—

(१) आदिवासी उपयोजना भागातील विकासाची पातळी व इतर भागातील विकासाची पातळी यामधील तफावत कमी करणे.

(२) आदिवासी जमातींच्या लोकांच्या राहणीमानात सुधारणा करणे.

(३) आदिवासींची पारंपरिक पिळवणुकी-पासून सुटका करणे.

(४) निरक्षरतेमुळे भेडसावणाऱ्या प्रश्नांची उकल करणे.

आदिवासी उपयोजनेखाली केलेली तर-तूद ही स्वतंत्र लेखाशीर्षकाखाली अर्थ-संकल्पात समाविष्ट केली जाते. आदिवासी उपयोजनेचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रण निरनिराळ्या स्तरांवर होते. पंचायत समित्या, जिल्हा स्तरांवरील यंत्रणा, विभागप्रमुख व शासन, याप्रमाणे सर्वच विभागाच्या किमान चार स्तरावर त्यांचे नियोजन व संनियंत्रण होते. आदिवासी उपयोजनेखाली प्रामुख्याने १४ जिल्हे व त्यातील ६६३८ गावांचा समावेश केलेला आहे. वैयक्तिक लाभाच्या कार्य-क्रमाचा फायदा उपयोजनेच्या क्षेत्राबाहेरील लाभधारकांनाही (सुमारे ५४ टक्के) १९८६–८७ पासून व्हावा म्हणून निराळी तरतूद अर्थसंकल्पात करण्यात येऊ लागली.

नियोजन, अंदाजपत्रक, संनियंत्रणाच्या संदर्भात अदिवासी उपयोजना—

आदिवासी उपयोजनेसाठी राज्याच्या एकूण नियतव्ययातूनच काही निधी उपयोजने-साठी निरनिराळ्या विभागाकडून योज-नेच्या खर्चावर आंधारित वेगळा काढला जातो. म्हणजेच उपयोजनेकरिता निर-निराळ्या विभागामार्फतच हा निधी उप-लब्ध केला जातो. आदिवासी उपयोजने-करिता लागणारा निधी लोकसंख्येच्या प्रमाणात उपलब्ध व्हावा असा राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. आदिवासींची लोकसंख्या महाराष्ट्राच्या एकूण लोक-लोकसंख्येच्या ९टक्के आहे. प्रत्यक्षात मात्र आतापर्यन्त असा नियतव्यय फक्त ७ टक्के पर्यंतच उपलब्ध झालेला आहे. वरील नियतव्यय ७ टक्केवरून ९ टक्केपर्यन्त वाढविण्याचे प्रयत्न शासन व खाते पातळीवरून संवाद साधून करण्यात येत आहेत.

राज्य निधीव्यतिरिक्त विशेष केंद्रीय सहाय्य केंद्रशासनाकडून पूरक निधी म्हणून दरवर्षी उपलब्ध करून देण्यात येतो. हे विशेष केंद्रीय सहाय्य उपलब्ध केले जाते.—

(१) आदिवासी उपाययोजना क्षेत्रा-करिता.

(२) माडा व मिनी-माडा क्षेत्राकरिता

(३) आरित जमाती करीता.

(४) आदिवासी क्षेत्राबाहेरील आदि-वासीकरिता.

सध्या वार्षिक व पंचवार्षिक योजनेचा प्रारूप आराखडा संबंधित विभागामार्फत जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून तयार करण्यात येतो. जिल्हा स्तरावरील योजनासाठी तो जिल्हा नियोजन मंडळा-कडून अंतिमतः शासनास सादर केला जातो.

वार्षिक योजनेच्या प्रारूप प्रस्ताव करताना, मूलभूत सोयी व संरचनांच्या क्षेत्र विकास योजना

वैयक्तिक लाभार्थ्यांच्या व कुटुंबानुवर्ती योजना, यावर भर दिला जातो.

नियोजन विभाग व केंद्र सरकारच्या नियोजन मंडळाकडून प्रारूप आराखड्यास अंतिम मान्यता मिळाल्यानंतर प्रारूप योजना तयार होते.

नियोजनाच्या आराखड्यात योजनावार नियतव्यय जो दर्शविला जातो तो अंदाजपत्रकात समाविष्ट करण्याची प्रक्रिया यानंतर सुरू होते.

वर्षाच्या सुरुवातीस आधीच्या वर्षीच्या सुरू असलेल्या योजना चालू ठेवावयाच्या असल्यास विभागाच्या सूचनांनुसार आवश्यक ती तरतूद अंदाजपत्रकात करण्यात येते. नवीन बाबींचे प्रस्ताव प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतर विधान सभेच्या नजरेस आल्यानंतरच अंदाजपत्रकात समाविष्ट करण्यात येतात. राहिलेले प्रस्ताव पुरवणी मागणीद्वारे वर्षाच्या उर्वरित काळात विधानसभेच्या नजरेस आणून मंजुरी घेतली जाते व अंदाजपत्रकात त्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद समाविष्ट करण्यात येते.

योजनेतील अंदाजपत्रकीय तरतुदीतील फेरबदल (अधिक/वजा) आठमाही/नऊमाही व अंतिम सुधारित अंदाजपत्रकाद्वारे करण्यात येतात. अंदाजपत्रकातील तरतुदी योग्य त्या अंमलबजावणी अधिकाऱ्याकडे आदिवासी विकास विभागाकडून सुपूर्द करण्यात येतात व मगच त्या त्या योजनांची अंमलबजावणी सुरू होते

अंमलबजावणी अधिकाऱ्याकडे वर्षाच्या सुरुवातीसच लक्ष्य आणि अपेक्षित तरतूद कळविण्यात येते.

संनियंत्रणाची पद्धती

दर महिन्याच्या ५ तारखेस अंमलबजावणी अधिकारी (इम्प्लीमेंटिंग ऑफिसर) जिल्ह्यातील त्याच्या अखत्यारीतील योजनांची पाहणी करून योग्य प्रपत्रात माहिती भरून ती विभागप्रमुखाकडे १० तारखेपर्यंत पाठवून, विभागप्रमुखाचे कार्यालयात या प्रपत्रांची छाननी होवून सर्व योजनांचा राज्यातील सारांश (स्कीमवाइज ॲबस्ट्रॅक्ट फॉर स्टेट) शासनास १५ तारखेच्या आत सादर केला जातो. तत्पूर्वी कमी वा आधिक्याची कारणे संबंधित अधिकाऱ्यास विचारली जातात व त्यास सुधारणा करण्यास वाव दिला जातो. या प्रपत्रावरून शासन स्तरावर लक्ष्य, साध्य, तरतूद व खर्च यावर नियंत्रण केले जाते.

शिफारशींचा गोषवारा

विकासाच्या योजनांच्या आराखड्यासाठी, अंदाजपत्रकीय तरतुदीच्या प्रस्तावासाठी, त्याचप्रमाणे खर्च व अंमलबजावणीच्या कामाकरिता, जिल्हा व प्रकल्पस्तरावर आदिवासी विकास विभागाची स्वतःची प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात नाही, इतर विभागाच्या जिल्हास्तरीय यंत्रणेवर अवलंबून रहावे लागते. या यंत्रणेवर त्या त्या विभागाच्या कार्यक्रमांचीही जबाबदारी असते व त्यांच्यावर आदिवासी विभागाचे अहवाल घेण्यापलीकडे नियंत्रण नसते. या अधिकाऱ्यावर काही प्रमाणात प्रशासकीय नियंत्रण आदिवासी विभागाचे असावे.

उपयोजनेच्या क्षेत्राबाहेरील आदिवासी लाभधारक शोधणे हे जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना फार कठीण होते. यासाठी खालील तीन पर्याय आहेत :—

(१) राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील क्षेत्र जवळच्या आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकाऱ्याकडे सोयीप्रमाणे जोडावेत.

(२) जिल्हा स्तरावर आदिवासी विकास विभागाने वर्ग दोनच्या पदांची निर्मिती करावी.

(३) समाज कल्याण अधिकारी वर्ग एक यांचेकडे हे अतिरिक्त काम द्यावे.

उपयोजनेच्या कार्याचे मूल्यमापन करताना प्रकल्पनिहाय माहिती लागते व एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पनिहाय ही माहिती शासनास सादर करण्यात येते परंतु कार्यान्वय अधिकाऱ्याकडे मात्र ही तरतूद (निधी) व इष्टांक संपूर्ण जिल्ह्यासाठी म्हणून दिले जाते. त्यामुळे योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांना प्रकल्पनिहाय अहवाल देता येत नाहीत. ही उणीव दूर करण्यासाठी प्रकल्प असतील त्या ठिकाणी प्रकल्पनिहाय व इतर ठिकाणी जिल्हानिहाय तरतूद व लक्ष्य ठरवून द्यावे.

वरील शिफारशींचा विचार झाल्यास सध्याच्या पद्धतीनुसार सुलभ काम करणे शक्य होईल. तथापि सध्या अस्तित्वात असलेले नियोजन अंदाजपत्रक व संनियंत्रणाची पद्धत समाधानकारक असून त्यात सुधारणेस वाव कमी आहे. शासनाकडे संगणकाद्वारे जे संनियंत्रण होते त्याचे अहवाल खाते पातळीवर ३० तारखेच्या आत मिळावेत म्हणजे पुढील महिन्यात सुधारणा करण्यास /मार्गस्थ करण्यास उपयोग होईल.

काही शाखांमध्ये काही योजना एकापेक्षा जास्त वर्षे चालत असते व त्यातील भौतिक लक्ष्यावर परीक्षणावर खर्च करावा लागतो व हा खर्च बांधील खर्च म्हणून करावाच लागतो. या बांधील खर्चाचा भार त्या पंचवार्षिक योजनेत वाढत जातो व त्याप्रमाणे नवीन प्रस्ताव नवीन बाब म्हणून आर्थिक अडचणीमुळे त्या पंचवार्षिक योजनेत सुरू करता येत नाही. तेव्हा अशा खात्याकडून दोन प्रकारांत प्रारूप वार्षिक योजना बनविणे योग्य राहील.—

(१) बांधील खर्चाची तरतूद त्वरीत मान्य होणेसाठी प्रारूप अर्थसंकल्प

(२) विकास योजनेसाठी नवीन बाब प्रस्ताव या प्रारूप खर्च संकल्पाची टक्केवारी खालच्या टक्केवारीवर अवलंबून असावी व त्यप्रमाणे प्राथम्यक्रम देण्यात यावा.

अभ्यासगट क्र. २

विषय : वने, शेती, पशुसंवर्धन तसेच दुग्धव्यवसायाच्या माध्यमातून आदिवासींचा आर्थिक विकास कसा साधता येईल ?

सभासद—

सर्वश्री. बी. बी. देशमुख
डी. एन. बऱ्हाटे
बी. एल. सिडाम

सर्वश्री. डॉ. बी. आर. मोरे
व्ही. व्ही. कांबळे
नि. ज. निंबाळकर

प्रास्ताविक :

आदिवासी समाज प्रामुख्याने वर्षानुवर्षे जंगलाच्या सान्निध्यात राहात आलेला आहे. अन्न, निवारा, तसेच उपजीविकेचे साधन म्हणून आदिवासींना प्रामुख्याने जंगलावरच अवलंबून राहावे लागते. त्यामुळे आदिवासींची आर्थिक व्यवस्था वनाशीच निगडित आहे. तसेच काही आदिवासींकडे अल्पशी जमीन असते व ती ते परंपरागत पद्धतीने करत आलेले आहेत. साहजिकच आदिवासींचा शेती व्यवसाय हा आतबट्टयाचा व्यवहार ठरलेला आहे. आदिवासींची आर्थिक उन्नती करून त्यांना इतर समाजाबरोबर आणावयाचे झाल्यास आजच्या परिस्थितीमध्ये वने, शेती व त्यांच्याबरोबर जोडधंदे म्हणून पशुसंवर्धन व दुग्धव्यवसायांच्या योजनांवरच लक्ष केंद्रित करणे क्रमप्राप्त आहे. त्या दृष्टीने आजच्या प्रचलित शासकीय योजनांमध्ये सुधारणा, तसेच नवीन योजनांचा अंतर्भाव करण्याची आवश्यकता आहे. त्या अनुषंगाने या समूहातील सर्व सभासदांनी चर्चेअंती सुचविलेल्या योजनांचा तपशील खालीलप्रमाणे विभागवार सादर केलेला आहे.

१. वनिकी :

(१) जंगल कामगार सहकारी संस्थांना राज्यात आता तोडीस क्षेत्र उपलब्ध नसल्याने या संस्थांना व पर्यायाने आदिवासींना वननिर्मितीच्या (रोपवने) कामात सहभागी करून घ्यावे.

(२) आदिवासी युवकांना वनोत्पादन आधारित व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात यावे. उदा.—सुतारकाम, बांबूकाम, मधुमक्षिकापालन, रेशीम (टसर) उद्योग. जंगलात आढळणाऱ्या हंगामी फळांचे संस्करण करून संस्कारित उत्पादने—उदा., जॅम, लोणची, सरबते इत्यादी बनविणे. सदर बाबतीत करवंदे, आंबा, जांभूळ, आवळा, कोकम, चिंच इत्यादी फळांचा उपयोग करून घेता येईल. तसेच पळसापासून द्रोणपत्रावळी बनविणे. सदर उत्पादित मालाला आदिवासी विकास महामंडळामार्फत बाजारपेठ उपलब्ध करून देण्यात यावी.

(३) घायपात लागवडीस उत्तेजन देण्यात यावे, जेणेकरून रोपवनांचे संरक्षण होऊन सदर कच्च्या मालापासून दोरखंड बनविण्याचा व्यवसाय अस्तित्वात येऊन, त्यामध्ये आदिवासींना सहभागी करून घेऊन, त्यांची आर्थिक उन्नती होण्यास मदत होईल.

२. कृषी :

(१) आदिवासी भागातील बऱ्याचशा शेत जमिनी उतारावरील व वरकस आहेत. त्यांची उत्पादनक्षमता व सुपिकता कमी आहे. या जमिनीवर मृद व जल संधारणाचे प्रयत्न होणे गरजेचे आहे. जेणेकरून होणारी झीज कमी होऊन जमिनीची प्रत वाढण्यास मदत होईल व उत्पादनक्षमता व सुपिकता वाढेल. नाला, बांधबंदिस्ती, करणे, समतल बांध घालणे, समतल रेषानुसार पेरणी करणे, जेथे तांत्रिकदृष्ट्या शक्य असेल तेथे पाणी अडवणे, इत्यादी प्रयत्नांची तीव्रता वाढविणे जरुरी आहे. आदिवासी भागात यासाठी विशेष जादा प्रयत्न व्हावे व कर्मचारीवृंद निर्माण करण्यात यावा.

(२) आदिवासी भागात सिंचनाच्या सोयी निर्माण करण्यात याव्या त्यामुळे आदिवासी शेतकऱ्याला एकापेक्षा जास्त पिके कमी जमिनीवर बागायती पद्धतीने घेता येतील व त्याची आर्थिक परिस्थिती सुधारेल. यासाठी जेथे जेथे हंगामी तसेच बारमाही पाण्याचे लहानमोठे प्रवाह आहेत, त्यांचे सर्वेक्षण होऊन तांत्रिकदृष्ट्या शक्य असेल त्याप्रमाणे बंधारे बांधून अडविण्यात येऊन, पाण्याचे साठे निर्माण करून, लघुसिंचन योजनांचे जाळे सहकारी तथा अनुदान तत्त्वावर उभारण्यात यावे.

(३) आदिवासी शेतकऱ्याला कृषी वनिकी पद्धतीसाठी उद्युक्त करण्यात यावे, शेतजमिनीत, बांधावर आर्थिक दृष्ट्या उपयुक्त व उत्पन्न देणाऱ्या झाडांची, उदा. आंबा, बोर, आवळा, जांभूळ, हिरडा, बेहेडा, चारोळी इत्यादी लागवड करण्यात यावी जेणेकरून शेतीच्या उत्पन्नाच्या अतिरिक्त चांगला आर्थिक लाभ होऊ शकेल.

(४) आदिवासी भागातील शैक्षणिक संस्था उदा. आश्रमशाळा, निवासी शाळां मध्ये इत्यादी ८ वी पासून पुढे कृषी, वनिकी, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र हे विषय सक्तीचे म्हणून अभ्यासक्रमात समावेश करण्यात यावेत. सदर शिक्षणाच्या उत्तम सोई उपलब्ध करण्यात याव्यात.

(५) आदिवासी विभाग दुर्गम असल्यामुळे शेतीला लागणारे निविष्टा उदा. बियाणे, खते, कीटकनाशके, इत्यादी वेळेवर पोहोचण्यासाठी सहकारी संस्था अधिक सक्षम करण्यात याव्या. सदर निविष्टा त्या भागात वेळेवर पुरवणे त्यांच्यावर कायद्याने बंधनकारक असावे. यासाठी देण्यात येणाऱ्या व्यवस्थापकीय अनुदानात भरीव वाढ करण्यात यावी. सदर अनुदान त्या भागातील खासगी व इच्छुक विक्रेत्यांना सुद्धा विशिष्ट अटींवर देण्यात यावे. उपलब्धता वाढून खताचा वापर वाढून उत्पन्न वाढ होईल.

३. पशुसंवर्धन :

(१) सद्यःस्थितीत पशुस्वास्थ्य चिकित्सासेवा देण्यासाठी ५००० पशुधन घटक संख्येमागे एक पशुचिकित्सा संस्था सातव्या योजनेअखेर राहावी हे धोरण आहे. आदिवासी विभागासाठी सदर अट शिथिल करण्यात येऊन हे प्रमाण २००० पशुधन घटक संख्येस एक असावे.

(२) आदिवासी क्षेत्रामध्ये ज्या ज्या ठिकाणी फिरत्या पशुचिकित्सा पथकाची सोय नाही त्या सर्व ठिकाणी अशा सुविधा निर्माण करण्यात याव्या.

(३) दुग्धविकासासंबंधीच्या विस्तार सेवा या अधिक व्यापक करण्यात याव्यात. दुग्धव्यवस्थापनासाठी आदिवासी युवकांना प्रशिक्षित करण्यात यावे.

(४) पशुसंवर्धन व दुग्धउत्पादन विस्तार सेवांचा अंतर्भाव कृषि–विस्ताराच्या प्रशिक्षण

व भेट योजना कार्यक्रमात करण्यात यावा. पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय हा कार्यक्रम कृषिविषयक कार्यक्रमाशी संलग्न आहे.

(५) वैरण विकासाच्या योजना मोठ्या प्रमाणावर घेण्यात याव्यात. जेणेकरून आजूबाजूच्या आदिवासी भागात दुग्ध-विकास व्यवसाय वाढण्यास मदत होईल.

(६) आदिवासींकडे असणाऱ्या अनुत्पादक जनावरांची संख्या कमी करण्याबाबत आदिवासींना प्रवृत्त करण्यात यावे व चांगल्या उत्कृष्ट जातीच्या जनावरांचा पुरवठा करण्यात यावा म्हणजे उत्पादनाची क्षमता वाढेल.

४. **दुग्धव्यवसाय**

(१) आदिवासी उपयोजनेच्या क्षेत्रात दुग्ध-व्यवसाय करणे ही पारंपरिक बाब नाही. आदिवासींना सदर व्यवसाय करण्यासाठी उत्तेजन मिळावे म्हणून उपयोजना क्षेत्रात दुधाच्या खरेदीची किंमत अस्तित्वात असलेल्या शासकीय दरापेक्षा प्रतिलिटर १ रुपया जादा देण्यात यावी.

(२) ज्या ठिकाणी अगोदर असलेली सहकारी दुग्धव्यवसाय संस्था कार्यरत नसेल, अशा ठिकाणी दुसरी संस्था स्थापन करून तिला जरूर ते फायदे देण्यात यावे.

(३) दुग्धव्यवसाय खात्यामार्फत शेतकऱ्यासाठी ७ दिवसांचा दुग्धव्यवसाय प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात येतो. सदर प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये विद्यावेतन देण्याची पद्धती नाही. त्यामुळे आदिवासी भागातून पुरेसे प्रशिक्षणार्थी उपलब्ध होत नाहीत व या कार्यक्रमाचा परिणाम दिसून येत नाही. यासाठी असे प्रस्तावित करण्यात येते की, यापुढे प्रशिक्षणार्थींना प्रतिदिन रुपये १५ (रुपये पंधरा) विद्यावेतन देण्यात यावे.

(४) आदिवासी भाग डोंगराळ दुर्गम असल्यामुळे दूध वाहतूक करणे किफायतशीर होत नाही. यासाठी दुध वाहतूक करणाऱ्या सहकारी संस्थांना वाहतूक अनुदान देण्यात यावे.

अभ्यास क्र. ३

विषय : "आदिवासी समाजास शिक्षणाचा प्रसार" या बाबतची साधकबाधक चर्चा—खर्चविषयक पृथक्करणे व आश्रम शाळांचे प्रशासन शिक्षण खात्याकडे द्यावे काय ?

सभासद—कु. सुगंधा बने

सर्वश्री. इ. ए. रोचा
बी. जी. सोमवंशी
एस. के. जंगम
डी. आर. बांगडे.
एफ. पी. कदम.
एस. एल. घरतकर.

आदिवासी उपयोजनेअंतर्गत शिक्षण विभागाच्या पुढील योजना या आदिवासी जनतेत प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून, समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.

१. शाळा नसलेल्या खेड्यात नवीन शाळा उघडणे.

२. एकशिक्षकी शाळांचे द्विशिक्षकीकरण करणे.

३. प्राथमिक शाळांना जोडून बालवाड्या उघडणे.

४. प्राथमिक शाळांतून पुस्तकपेढ्या उघडणे.

५. ९ ते १४ वयोगटातील शाळाबाह्य विद्यार्थ्यांसाठी अंशकालीन वर्ग उघडणे.

६. विद्यार्थ्यांना गणवेश व लेखनसाहित्य पुरविणे.

७. शाळागृहांची बांधकामे व अपूर्ण बांधकामे पूर्ण करणे.

८. नवीन माध्यमिक शाळा उघडणे.

९. प्रौढ शिक्षणाची केंद्रें उघडणे.

१०. आदिवासी मुलांकरिता केळापूर (जिल्हा यवतमाळ) येथे विद्यानिकेतन.

११. शिक्षक कुटुंबात राहण्याची आदिवासी विद्यार्थ्यांना सुविधा.

१२. आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतने.

प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण करण्याच्या दृष्टीने ६ ते १४ वयोगटातील सर्व मुलामुलींना सन १९९० पर्यन्त शालेय शिक्षणाची सुविधा प्राप्त करून द्यावयाची आहे. प्राथमिक शिक्षण हे किमान गरजा कार्यक्रमांतर्गत असल्यामुळे आदिवासी मुलामुलींना देखील प्राथमिक शिक्षणाची सोय प्रत्येक २०० च्या वर लोकसंख्या असलेल्या खेड्यांत/वस्त्यांमध्ये करून द्यावयाची आहे. आदिवासी मुलामुलींना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून प्रत्येक १ ते ४ वर्ग असलेल्या प्राथमिक शाळेला जोडून बालवाडी उघडण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. वर्ग १ व २ मधील मुलामुलींना मोफत गणवेष व लेखनसाहित्य देऊन त्यांना शाळेत येण्यासाठी आकृष्ट करण्यात येते. मुलामुलींना पाठ्यपुस्तकेदेखील मोफत दिली जातात.

सन १९८७–८८ "सामान्यशिक्षण" या शीर्षकाखाली रुपये २१.३७ लाख नियतव्यय होता. रुपये ३५० प्रत्येक मुलासाठी दरमहा आश्रमशाळेतून खर्च केला जातो.

सध्या आदिवासी विभागात ६६०६ प्राथमिक शाळा असून ३९२ माध्यमिक शाळा आहेत. शाळागृहे बांधण्याचा कार्यक्रमदेखील एन. आर. इ. पी/ आर. एल. इ. जी. पी. खाली राज्य शासनाने हाती घेतलेला आहे. १ ते ४ वर्ग असलेल्या प्रत्येक प्राथमिक शाळेला दोन खोल्या असणारी इमारत असावी, अशी योजना आहे. तसेच एकशिक्षकी शाळा या नवीन योजनेनुसार क्रमशः द्विशिक्षकी करावयाचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. तसेच प्रत्येक प्राथमिक शाळेत रुपये ७२१५ रुपयांचे शक्षणिक साहित्य हे उपलब्ध करून देण्यात येत आहे. हा कार्यक्रम नवीन शैक्षणिक धोरणानुसार "ऑपरेशन ब्लॅकबोर्ड" या योजनेअंतर्गत केंद्र शासनाचे अनुदानाने राबविण्यात येत आहे.

१०७ अनुदानित आदिवासी आश्रमशाळा असून ३३४ शासकीय आश्रमशाळा

आहेत. आदिवासी विकास विभागामार्फत या आश्रमशाळांचे प्रशासन चालविले जाते. या आश्रमशाळांची फक्त शैक्षणिक तपासणी शिक्षण खात्यामार्फत केली जाते. १०७ पैकी ५१ व ३३४ पैकी १११ शाळा पोस्ट बेसिक आश्रमशाळा झाल्या आहेत.

आदिवासी विभागातील शासकीय आश्रमशाळा व अनुदानित आश्रमशाळांमध्ये देखील व्यावसायिक शिक्षण देण्याच्या दृष्टीने उच्च प्राथमिक वर्गापासून व्यवस्था करण्यात यावी असे या अभ्यासगटाचे मत आहे.

आश्रमशाळाचे प्रशासन व नियंत्रण आदिवासी विकास खात्याकडेच असावे. तथापि शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने व शैक्षणिक प्रशासनात सुधारणा व्हावी म्हणून आदिवासी विकास संचालनालयात शिक्षण विभागाचा वेगळा कक्ष असावा व त्या कक्षामध्ये शिक्षण विभागातील ज्येष्ठ व सक्षम अधिकारी नेमण्यात यावेत अशी या अभ्यासगटाची शिफारस आहे.

खर्चविषयक पृथक्करण

शीर्षक	अर्थसंकल्पीय तरतूद १९८७–८८	खर्च मार्च ८८ अखेर
प्राथमिक शिक्षण	२३२.८५	१६८.१८
माध्यमिक शिक्षण	३७.८६	३९.६५
प्रौढ शिक्षण	७६.५०	६७.२६
सर्वसाधारण शिक्षण	३०.०९	४७.३०
एकूण ..	३७७.३०	३२२.३९

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत शिक्षणाची महत्त्वाची भूमिका आहे. विकासाच्या योजना यशस्वीरीत्या कार्यान्वित करण्यासाठी प्रशिक्षित सक्षम मनुष्यबळ निर्मितीचे शिक्षण हे प्रमुख साधन आहे.

प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रीकरणासाठी आदिवासी उपयोजनेअंतर्गत प्राथमिक शाळांना जोडून बालवाड्या उघडण्यात आल्या असून फिरत्या प्राथमिक शाळांची योजना प्रायोगिक स्वरूपात सुरू करण्यात आली आहे. गळतीची समस्या आदिवासी विभागात अधिक तीव्र स्वरूपात असल्यामुळे प्राथमिक शाळांतून आदिवासी मुलांचे उपस्थितीचे प्रमाण टिकून राहण्यासाठी अनेक उत्तेजनपर योजना सुरू करण्यात आलेल्या आहेत. नवीन शाळा उघडणे, एकशिक्षकी शाळा द्विशिक्षकी करणे व पटसंख्येनुसार शिक्षकांच्या नेमणुका करणे. यावरील खर्च शिक्षकांच्या नेमणुका उशिरा झाल्यामुळे सन १९८७–८८ मध्ये कमी झालेला दिसतो. माध्यमिक शिक्षणावर अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्त खर्च झालेला आहे. प्रौढ शिक्षणावरील खर्च कमी झालेला दिसतो. कारण प्रौढ शिक्षण केंद्राचा सर्व बाबींवरील अपेक्षित खर्च काही जिल्ह्यांमध्ये झालेला नसावा. "सर्वसाधारण शिक्षण" या शीर्षकाखाली अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्त खर्च झालेला आहे.

अभ्यासगट क्र. ४

आदिवासींसाठी स्वयंरोजगार योजना त्या आदिवासींसाठी राबविण्याची शक्यता. आदिवासी विकासात सहभागी असलेल्या स्वयंस्फूर्त संस्था, अधिकारी व पदाधिकारी यांचेकडून त्यांचा विकास झाला किंवा शोषण झाले आहे किंवा कसे.

सभासद—

१. श्री. पी. एस. देशपांडे
२. ,, ए. एच. चांदेकर
३. ,, एस. एन. माळी.
४. ,, बी. एस. घारड
५. ,, बी. एस. कोळसे.
६. ,, सी. जी. उईके.

भारतीय घटनेच्या कलम ३४२ अन्वये आदिवासी जमातींची संज्ञा ठरविण्यात आली असून मा. राष्ट्रपती यांचे ६ सप्टेंबर १९५० चे आदेशानुसार, त्या संज्ञेस कोणत्या अनुसूचित जमाती पात्र आहेत हे निश्चित करण्यात आले आहे. या आदेशात घटनेतील तरतुदीनुसार भारताच्या संसदेने १९५६, १९६० व १९७६ साली, त्यांनी पारित केलेल्या कायद्यानुसार वेळोवेळी बदल केलेले आहेत, घटनेत ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार व मा. राष्ट्रपतींचे आदेशाप्रमाणे महाराष्ट्र राज्यात एकूण ४७ अनुसूचित जमाती असून त्यांपैकी भिल, गोंड, महादेव कोळी, मल्हार कोळी, ढोर अथवा ढोकरे कोही, कोकणा, कोरकू व कोलाम या प्रमुख जमाती आहेत. घटनेतील आर्टिकल ४६ अनुसार अनुसूचित जमातींची शैक्षणिक व आर्थिक उन्नती करण्याची जबाबदारी तसेच त्यांचेवर होत असलेल्या सामाजिक अन्यायापासून त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी केंद्र शासनाची व राज्य शासनाची आहे.

आदिवासी हे सर्वसामान्य जनतेपासून दूर डोंगरदऱ्यांत राहतात. त्यांची शैक्षणिक व आर्थिक उन्नती झालेली नाही व त्यांचे उघड व अप्रत्यक्ष शोषण झालेले आहे हे उघड सत्य आहे. प्रत्यक्षात आदिवासी हे त्यांच्या पूर्वापार शेतीवर व वनउपजावर अजूनही अवलंबून आहेत. त्यांची परिस्थिती अजूनही बहुतांशी तशीच आहे. त्यात काही सुधारणा झाली आहे असे आढळून येत नाही. ही परिस्थिती असताना देखील त्यांचेतील पूर्वापार चालत आलेले उद्योग उदा. हस्तकला, बांबूकाम, सुतारकाम, मासेमारी, शिकार, पाळीव प्राण्यांचे संगोपन इत्यादी त्यांनी जतन करून ठेवले आहे. शेती अथवा शेतमजुरी व वरील उद्योग यावरच ते आपली उपजीविका करीत असतात. हे उद्योग त्यांचे उत्पन्नाचे अथवा अर्थार्जनाचे साधन नसून ह्या उद्योगांचा वापर ते स्वतःपुरताच मर्यादित करतात. हीच त्यांची जीवनपद्धती पूर्वी होती व आजही त्याच पद्धतीचा वापर ते मोठ्या प्रमाणात करतात. याला कारण म्हणजे आदिवासींच्या मूलभूत गरजा या अतिशय सीमित असल्यामुळे व जे मिळते त्यातच समाधान मानण्याची वृत्ती त्यांच्यात निर्माण झाल्यामुळे, शेती व ते करीत असलेल्या उद्योगातून निर्वाहापुरते मिळविल्यानंतर आपल्या आर्थिक उत्पन्नात भर पडावी ही त्यांची अपेक्षा पूर्वी नव्हती व आजही थोड्याफार प्रमाणात तीच परिस्थिती पाहायला मिळते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सर्वसाधारण जनतेबरोबरच आदिवासींच्या शैक्षणिक, सामाजिक

व आर्थिक परिस्थतीचा विचार शासनाने केला. त्यात आदिवासी हा सर्वच क्षेत्रांत इतरांच्या तुलनेत खूपच मागे असल्याचे आढळून आले. तेव्हा त्यांचे जीवनमान सुधारावे या उद्देशाने व सामाजिक न्यायाचे दृष्टीने शासनाने त्यांचे विकासासाठी विविध प्रकारच्या शैक्षणिक व आर्थिक उन्नतीच्या योजना कार्यान्वित केल्या.

आपण त्यांच्या स्वयंरोजगारविषयीच्या योजनासंबंधी विचार करणार आहोत. पंचवार्षिक योजना सुरू झाल्यानंतर शासनाच्या विविध विभागामार्फत, आदिवासींना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावेत म्हणून अनेक योजना राबविण्यात आल्या. उदा. सामुदायिक विकास व राष्ट्रीय विकास योजना या व इतर योजनांमधून त्यांना धंदेशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली. आदिवासींच्या कल्याणासाठी जे आदिवासी-विकास गट (ट्रायबल डेव्हलपमेंट ब्लॉक्स) स्थापन करण्यात आले, त्याद्वारेही आदिवासींकरिता स्वयंरोजगारच्या योजना राबविण्यात आल्या. तथापि, ह्या सर्व योजनांचा समन्वय एकाच ठिकाणाहून व्हावा म्हणून त्यांचेसाठीच्या स्वयंरोजगारांच्या योजना १९७६ पासून आदिवासी उपयोजनेद्वारे व १९७८ पासून एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमाद्वारे राबविण्यास सुरुवात झाली आहे.

एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रमानुसार १८ ते १५ वयोगटातील आदिवासी युवक-युवतींना निरनिराळ्या प्रकारचे धंदे प्रशिक्षण, उदा. शिवणकाम, सुतारकाम, बांबूकाम इत्यादी देण्यात येते व धंदा सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्यही देण्यात येते. तथापि, वरील योजनांचा कायदा हा दारिद्र्यरेषेखालील आदिवासी कुटुंबांनाच मिळू शकतो. जी कुटुंबे दारिद्र्य रेषेमध्ये समाविष्ट नाहीत अशा कुटुंबांसाठी स्वयंरोजगाराच्या योजना या आदिवासी उपयोजनेद्वारे राबविण्यात येतात. उदा. कुक्कुटपालन, मासेमारी, दुग्धव्यवसाय, बांबूकाम, शिवणकाम, वाहन प्रशिक्षण, टंकलेखन, तांत्रिक प्रशिक्षण इत्यादी. याव्यतिरिक्त धंदा सुरू करण्यासाठी त्यांना आर्थिक मदतही मिळू शकते.

या सर्व योजनांचा विचार करता असे वाटते की, या सर्व योजना आदिवासींच्या आर्थिक उन्नतीकरिता त्यात थोडाफार बदल करून राबविण्यास उपयुक्त आहेत. या योजनांचा फायदा अनेक कुटुंबांनी घेतलेला असून त्यामुळे काहींचे जीवनमान उंचावण्यास निश्चितपणे मदत झाली आहे. तथापि, या योजनांचा सर्वांगीण विचार केल्यानंतर असे दिसून येते की, त्यांचा अपेक्षित असलेला परिणाम (इंपॅक्ट) झालेला नाही. त्यांचा फायदा लाभार्थींना पाहिजे त्या प्रमाणात झालेला नाही. त्याची अनेक कारणे आहेत, त्यापैकी महत्त्वाची कारणे खाली दिली आहेत. :—

(१) आदिवासींमध्ये या योजना स्वीकारण्यासाठी आवश्यक असणाऱ्या आवडींचा अभाव (त्यांच्या किमान गरजा मर्यादित असल्यामुळे जास्त उत्पन्न मिळावे म्हणून विविध योजना स्वतः राबविण्यास ते प्रयत्नशील नाहीत).

(२) योग्य लाभार्थींची निवड न होणे.

(३) ज्या आदिवासी भागात जी योजना चांगल्या रीतीने कार्यान्वित होऊ शकेल अशा भागातील योजना राबविणे (उदा. हिरवा चारा उपलब्ध नसताना गाई, म्हशी पुरविणे.)

(४) त्या भागासाठी आवश्यकतेपेक्षा जास्त व्यक्ती स्वयंरोजगार प्रशिक्षणासाठी निवडणे. प्रशिक्षणानंतर ते एकाच भागात अथवा गावात आपला स्वयंरोजगार सुरू करतात, की ज्यामुळे कोणाचाही धंदा फायद्यात राहात नाही.

(५) लाभार्थींची प्रशिक्षणानंतर स्वयंरोजगार करण्याची उदासीनता असणे.

(६) लाभार्थींमध्ये स्वयंरोजगार चालविण्यासाठी लागणाऱ्या ज्ञानाचा व कुशलतेचा अभाव.

(७) त्यांनी तयार केलेल्या मालाचा अथवा दिलेल्या सेवेचा दर्जा इतरांपेक्षा कमी प्रतीचा असणे.

(८) तेथील स्थानिक परिसरात वस्तु विक्रीची व्यवस्था नसणे अथवा यांना मागणी नसणे.

(९) अधिकारी, पदाधिकारी यांचेकडून योग्य मार्गदर्शन व पाठपुरावा (फॉलो-अप) याचा अभाव असणे.

(१०) प्रशिक्षण देणाऱ्या योग्य प्रशिक्षकांचा व प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांचा अभाव असणे.

तेव्हा या योजना नीट राबविण्यासाठी व स्वयंरोजगार योजनांचा फायदा आदिवासींना त्यांचे आर्थिक उन्नतीसाठी मिळावा म्हणून वरील कारणे नाहीशी करणे आवश्यक आहे. वरील कारणे नाहीशी करून, आदिवासींची मानसिक जडणघडण, त्यांच्या मूल्यांना धक्का न लावता त्यासाठी घडवून आणणे, इच्छुक व योग्य लाभार्थी निवडणे व अधिकारी व पदाधिकारी यांनी या कामी वैयक्तिक लक्ष घालून लाभार्थींच्या निवडीपासून ते त्यांचा धंद्यात नीट जम बसण्यासाठी मार्गदर्शन व पाठपुरावा करणे, इत्यादी बाबी नीट हाताळल्यास आदिवासींच्यासाठी असलेल्या या स्वयंरोजगाराच्या योजना निश्चितपणे यशस्वी होतील व त्यांचे जीवनमान उंचावेल यांत शंका नाही.

शासनाने आदिवासींसाठी ज्या अनेकविध योजना राबविल्या आहेत, त्यांचा निश्चित असा परिणाम झालेला असून त्यांच्यात विकासाबाबत जागृती निर्माण झाली आहे. तथापि स्वयंरोजगार योजनांचा फायदा आदिवासींनी पाहिजे त्या प्रमाणात घेतलेला आहे असे दिसून येत नाही. त्याच्या कारणमीमांसेवर आपण वर चर्चा केलेली आहेच.

आदिवासींचे शोषण होते का हा प्रश्न ह्या निमित्ताने उपस्थित होतो. या प्रश्नाचे उत्तर आपणास काही प्रमाणात होकारार्थीच द्यावे लागेल. आदिवासींच्या अज्ञानाचा, दारिद्र्याचा व भोळेपणाचा फायदा घेऊन त्यांचे शोषण केले गेले आहे व अजूनही काही प्रमाणात होत आहे. हे सत्य आहे. स्वयंरोजगाराच्या योजना राबवीत असताना सुद्धा त्यांचे शोषण होते हेही आपणास मान्य करावेच लागेल. त्यासाठी अनेक कारणे असू शकतील. त्यातील मोजकी कारणे खालीलप्रमाणे आहेत. :—

(१) त्या भागात काम करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांनी आदिवासींच्या अज्ञानाचा वा अपूर्ण माहितीचा फायदा घेऊन योजनेची खरी माहिती न देता, योजनेतून लाभ मिळवून देण्यासाठी भ्रष्टाचाराचा अवलंब करणे.

(२) आदिवासींना वस्तुरूपाने जे साहित्य दिले जाते त्याच्या खरेदीत भ्रष्टाचार करणे, उदा. निकृष्ट साहित्य पुरविणे, वस्तूच्या किंमती वाढवून घेणे इत्यादी.

(३) अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे होणारे शोषण (उदा. आदिवासी विभागात काम करण्याची नाखुषी, त्यामुळे कामात लक्ष नसणे, आदिवासींबद्दल आत्मीयता नसणे, त्यांना वारंवार हेलपाटे मारावयास लावणे, कोणतीही जबाबदारी स्वतः स्वीकारण्याची तयारी नसणे.)

(४) आदिवासी भागात काम करणाऱ्या स्वयंस्फूर्त संस्था ह्यासुद्धा स्वतःचा प्रभाव वाढविण्यासाठी स्वार्थप्रेरित उद्देशाने आदिवासींचे शोषण करतात.

(५) आदिवासींना धंद्यासाठी आर्थिक मदतीद्वारे मिळालेल्या वस्तू.—उदा. गाई, म्हशी, बैलगाडी, शिलाई मशीन, मासेमारीचे जाळे, इत्यादी आदिवासींपासून अल्प किंमत देऊन खरेदी करतात व स्वयंरोजगारापासून तो वंचित झाल्यामुळे त्यांचे आर्थिक शोषण होते.

वृत्तविशेष १

आदिम व्याधिमुक्तीसाठी आदिवासी आरोग्य संशोधन प्रकल्प

केवळ सुईच्या टोकावर मावेल इतके 'आयोडिन' एक माणसाला दिवसभरासाठी पुरेसे असते. परंतु आदिवासींचे आहारात तेवढेही आयोडिन मिळू शकत नाही. परिणामतः अशा व्यक्तींना गलगण्ड रोग होतो. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे धुळे जिल्हा होय.

रक्तात ५ ग्रॅम हिमोग्लोबिन असलेली व्यक्ती सर्वसमान्य जीवन जगू शकत नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे. परंतु रक्तात २–२½ ग्रॅम हिमोग्लोबिननचे प्रमाण असलेले असंख्य आदिवासी सातपुड्यात कष्टाचे जीवन रेटीत आहेत.

सिकलसेल हिमोग्लोबिन दोषाचे प्रमाण आदिवासींमध्ये शे. १५ ते ३० टक्के आहे. संख्याशास्त्राचे आधारे साधारणत: ७० ते ७५ हजार आदिवासी मुले सिकलसेल पंडू रोगाचे शिकार झालेत. अशी दुर्दैवी मुले जेमतेम १५ ते २० वर्षे रोगी अवस्थेतच जीवन जगत असतात.

पुणे बी. जे. मेडिकल कॉलेजच्या 'आनुवंशिक दोष' या विभागाने महाराष्ट्रातील आदिवासींच्या आरोग्य समस्यांबाबत पाहणी व संशोधन कार्य हाती घेतले. बी. जे. मेडिकल कॉलेजचे प्रा. डॉ. सु. ल. काटे, डॉ. सौ. मृदुला फडके, प्रा. पराशर फुलमाळी, खराडे आदींनी राष्ट्रीय सेवायोजनेतील विद्यार्थी आणि धुळे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अमृतसिंग यांचे सहकार्याने १९८३ ते ८५ चे कालावधीत नर्मदा-तापी खोरे व सातपुड्याच्या डोंगररांगांतील आदिवासींची तपासणी व पाहणी केली असता वरील भयानक सत्य उजेडात आले.

अनादी अनंत काळापासून सातपुड्यात वास्तव्य करणाऱ्या आदिवासींना सातपुड्याइतक्याच जुन्या दुर्धर व्याधी जडल्या असून त्यापासून मुक्ततेसाठी 'आदिवासी आरोग्य संशोधन' हा एकमेव पर्याय असल्याने बी. जे. मेडिकल कॉलेजच्या 'आनुवंशिक दोष' विभागाने एक अहवाल शासनास सादर केला. परंतु, लालफितीचे कारभारामुळे सदर प्रकल्पास सत्वर मंजुरी मिळाली नाही. मध्यंतरी बामणी, मुरबाड, भादल, कामोद, पिंपरापाणी, आदी ठिकाणी मृत्यूकांड घडून शेकडो वनपुत्राचे बळी गेले.

सरतेशेवटी १९८९ चा जानेवारी उजाडला अन् उशिरा का होईना उपेक्षित आदिवासींच्या आरोग्य समस्या दूर होणसाठी 'आदिवासी आरोग्य संशोधन प्रकल्प' योजनेस शासनाने मान्यतेचे शिक्कामोर्तब केले आहे. पुणे बी. जे. मेडिकल कॉलेजचे 'आनुवंशिक दोष' या विभागातच हा प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. यासाठी सातत्याने धुळे जिल्ह्यातील पत्रसृष्टीने पाठपुरावा केला.

केवळ धुळेसारख्या आदिवासी जिल्ह्यात नव्हे तर महाराष्ट्रातील पश्चिमेकडील रायगड जिल्ह्यापासून तर पूर्वेकडील नांदेड, यवतमाळ, गडचिरोली हा आदिवासी लोकवस्तीचा पट्टा अन् ठाणे, नाशिक, पुणे, जळगाव, अमरावती, चंद्रपूर हे जिल्हे या प्रकल्प योजनेखाली येत आहेत. पुणे हे जरी मुख्यालय असले तरी खरे कार्य आदिवासी दुर्गम भागात जाऊनच करावे लागणार आहे. त्या दृष्टीने या प्रकल्पात काम करणारे 'मिशनरी' वृत्तीचे असले तरच खऱ्या अर्थाने या योजनेस मूर्त रूप येईल, अन्यथा वातानुकूलीत केबिनमध्ये बसून शासनाच्या लोकाभिमुख निर्णयानुसार जनहिताच्या योजना नुसत्या कागदावरच राबविणारे अधिकारी-कर्मचारी त्या योजनेचा 'फियास्को' कसा करतात हे आतापर्यन्त अनेक वेळा पाहावयास मिळाले आहे.

वृत्तविशेष २

उपेक्षित आदिवासींच्या मूलभूत व सर्वस्पर्शी आरोग्यसमस्या

महाराष्ट्रात आदिवासी समाज गुजरात, मध्यप्रदेश या राज्यांच्या सीमेवर माथ्यावर नाशिक, पुणे, ठाणे, रायगड, अमरावती, गडचिरोली, नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर या जिल्यातून विखुरलेला आहे. आदिवासी समाजाची लोकसंख्या १९८१ चे शिरगणतीनुसार ५७०७२०० इतकी आहे. महाराष्ट्राच्या लोकसंख्येच्या साधारण १० टक्के आदिवासी समाज असून त्यांच्या आर्थिक, शैक्षणिक या समस्यांबरोबर आरोग्य समस्याही गंभीर आहेत. आदिवासींचे विकासासाठी लाखो रुपये खर्च होतात. पण विकासकार्यात होणारा खर्च अनाठायीच म्हणावा लागेल. आदिवासींचा खरोखरच विकास करावयाचा असेल तर त्यांना अगोदर आरोग्यसंपन्न करायला हवे ! तरच आधुनिक विकासाचे गतीत ते सामावू शकतील. यासाठी अगोदर आदिवासींच्या मूलभूत व सर्वस्पर्शी समस्या काय आहेत, हे जाणून घ्यायला हवे आहे.

पूरक अन्नाचा अभाव : —प्रथिने, जीवनसत्त्वे, लोह व आयोडिन ह्या अन्नातील योग्य घटकांची कमतरता त्यामुळे पंडुरोग, गलगण्ड यासारख्या रोगांचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव.

आनुवंशिक दोष :—रक्तातील तांबड्या पेशींमध्ये सिकल सेल हिमोग्लोबिन व एन्झायमची कमतरता झाल्याने आयुष्यमान कमी करणारे आनुवंशिक दोष.

मोहाचे, दारूचे अतिसेवन :—दारू हा आदिवासी जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनून राहिला आहे. दारूचे अतिसेवनाने शरीरातील महत्त्वाचे अवयव काम करीत नाहीत.

सार्वजनिक स्वच्छतेचा अभाव :—आदिवासी समाज जंगल विभागात व डोंगर-माथ्यावर राहात असल्याने त्यांना स्वच्छ हवा मिळते पण पिण्याचे पाण्याची पावसाळ्यानंतर दुर्मिळता व प्यायचे पाणी पिण्यास योग्य नसल्याने जन्त व हगवण यांचे प्रमाण जास्त त्यामुळे सततची पोटदुखी.

आरोग्याबाबत अज्ञान व अंधश्रद्धा :—अतिदुर्गम जागी विखुरलेला, पाड्यापाड्यात राहणारा आदिवासी, आरोग्यसेवेपासून मुळातच वंचित आहे. रूढी, अंधश्रद्धा, यामुळे रोगावर दवापाणी करण्याऐवजी भगत-मांत्रिकाकडून जादूटोणा करून घेण्याची सनातन प्रवृत्ती.

वृत्तविशेष ३

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था

महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१

पुणे विद्यापीठ मान्यता

आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे-१ या संस्थेस पुणे विद्यापीठ कायदा, १९७४ कलम ४६ अन्वये शैक्षणिक वर्ष माहे जून, १९८९ पासून पुणे विद्यापीठाने "**संशोधनासाठी**" तत्त्वाने मान्यता दिली आहे.

पुणे विद्यापीठाच्या मान्यतेच्या अनुषंगाने "Diploma in Tribal Development" (सुरुवातीस सेवांतर्गत) हा विद्यापीठमान्य अभ्यासक्रम सुरू करण्याचा संस्थेचा मनोदय असून मा. सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे प्रस्ताव पाठविला आहे. शासनाकडून त्याबाबत आवश्यक ती मंजुरी मिळाल्यानंतर पुढील कार्यवाही सुरू करण्यात येईल.

संग्रहालय

आदिवासी हस्तकला, चित्रकला व वस्तू प्रदर्शन

श्री. यू. आर. सोनवणे,
अभिरक्षी.

१) वारली चित्रकला स्पर्धा–मेंढवण
२) आदिवासी हस्तकला प्रदर्शन–मुंबई
३) वारली चित्रकला नेतृत्व शिबिर, गंजाड
४) संग्रहालय वस्तू संकलन
५) संग्रहालयातील दोन शोकेसेसची पुनर्रचना.
६) आदिवासी हस्तकला पुस्तकांसाठी छायाचित्र व माहिती.

या सर्व कार्यक्रमांची माहिती थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे.

१) आदिवासी पारंपरिक चित्रकला स्पर्धा. मेंढवण, ता. पालघर, जि. ठाणे

आदिवासी हस्तकलापैकी ठाणे जिल्ह्यातील पारंपारिक पद्धतीने चालू असलेली " वारली चित्रकला " ही महाराष्ट्रातील आदिवासींची प्रमुख हस्तकला आहे. सामाजिक धार्मिक महत्त्व असलेल्या या कलेला गंजाड, रायतळी, जामशेत या डहाणू तालुक्यातील विशिष्ट पंचक्रोशीतील काही होतकरू आदिवासी कलाकारांनी गेल्या २/३ दशकापासून या पारंपारिक आदिवासी कलेला रचनात्मक रूप देऊन या प्रकारातील मूलभूत चित्रप्रकारावर आधारित सुंदर चित्ररचना काढून या कलेला व्यापक रूप दिले. या चित्रातील निरागस भाबडे व असंस्कारित मूळ आविष्कार कलाजगताने उचलून धरले. आज या कलेला जगमान्यता मिळालेली आहे. सर्व ठिकाणच्या भारत महोत्सवात व अपना उत्सवामध्ये वारली चित्रकला प्रात्यक्षिक व प्रदर्शनासाठी समाविष्ट करण्यात आली होती. वारली कलेच्या या गुणाची जाणीव संस्थेस असल्यामुळेच सन १९८५ पासून ठाणे जिल्ह्यात वारली चित्रकला स्पर्धा घेण्यात येते. ही स्पर्धा दोन विभागात घेण्यात येते. प्रौढ वारली चित्रकला कलाकारांना उत्तेजन व प्रोत्साहन मिळावे व प्रथितयश वारली चित्रकला कलाकारांच्या चित्रातून अनुभूती घेऊन इतर भागातील कलाकारांनीही या कलाव्यासंगास वाहून घ्यावे यासाठी १०० विद्यार्थ्यांची एक अशा स्वरूपात ही स्पर्धा आयोजित करण्यात येते. दोन्ही स्पर्धासाठी आवश्यक रंग, कागद व इतर चित्रकला साहित्य संस्थेतर्फे मोफत पुरविण्यात येते.

प्रौढ गटातील वारली चित्रकला स्पर्धा

सन १९८८–८९ सालच्या प्रौढ गटातील व शालेय गटातील दोन्ही चित्रकला स्पर्धा दिनांक २७ सप्टेंबर १९८८ रोजी शासकीय आश्रमशाळा, मेंढवण, तालुका पालघर, जिल्हा ठाणे येथे आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेत मुरबाड, शहापूर, वाडा, वसई, डहाणू, मोखाडा, जव्हार, तलासरी या तालुक्यांतून ९२ स्पर्धकांनी भाग घेतला. या सर्वांना जाण्या-येण्याचा प्रत्यक्ष प्रवासखर्च एकूण रुपये १,००४ व एक दिवसाचा हजेरी भत्ता रुपये १२ प्रत्येकी प्रमाणे एकूण १,१०४ देण्यात आला. याखेरीज सर्व स्पर्धकांना दुपारचे जेवण देण्यात आले. प्रौढांच्या चित्रकला स्पर्धेत २० जणांना गुणानुक्रमाने बक्षिसे देण्यात आली.

२) शालेय चित्रकला स्पर्धा

आदिवासी विकास अधिकारी, डहाणू यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व आदिवासी आश्रमशाळांतून ११७ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भाग घेतला. वाडा व जव्हार तालुक्यातील शाळांतूनही काही विद्यार्थी आले होते. या स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली.

या स्पर्धेसाठी मेंढवण आश्रमशाळेचे मुख्याध्यापक, श्री. भोईर व सहशिक्षक श्री. कुलकर्णी यांनी भरपूर परिश्रम घेऊन संस्थेला सहकार्य दिले.

२) आदिवासी हस्तकला प्रदर्शन सचिवालय जिमखाना, मुंबई.

आदिवासींचे वस्तू उत्पादन गरजेवर आधारित आहे. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने निर्माण होणाऱ्या त्यांच्या हस्तोद्योगातील वस्तू सहज उपलब्ध होत नाहीत. विक्रीसाठी त्यांच्याकडे शिल्लक वस्तू उपलब्ध होत नाहीत. वास्तविक हस्तकला वस्तूंच्या धोरणेनुसार कमीत कमी हत्यारांचा वापर व जास्तीत जास्त हाताने वस्तुनिर्मिती सध्या तरी फक्त आदिवासीच करीत आहेत. त्यांच्यामध्येही कसबी कलाकार आहेत. परंतु अनेक कारणांनी आदिवासींच्या वस्तू जनतेसमोर आल्या नाहीत. आदिवासी हस्तकला वस्तूंचा नागरी भागात प्रचार व प्रसार झाल्यास या हस्तव्यवसायांना उत्तेजन मिळून आदिवासींना ते जोपासता येतील व त्यातून काही आदिवासींना स्वयंरोजगार निर्माण करता येतील या उद्देशाने संस्थेने प्रात्यक्षिकासह आदिवासी हस्तकला वस्तुविक्री प्रदर्शने आयोजित केली. याच मालिकेतील ४ थे आदिवासी हस्तकला प्रदर्शन सचिवालय, जिमखाना येथील प्रांगणात मुंबई येथे दिनांक ९ ते १३ ऑक्टोबर, १९८८ या कालावधीत भरविण्यात आले होते. या प्रदर्शनासाठी आलेल्या कलाकारांना जाण्यायेण्याचा प्रत्यक्ष खर्च, मुंबईत राहण्याची व जेवणाची

सोय संस्थेने केली होती. याखेरीज त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून त्यांना त्यांच्या मगदुराप्रमाणे कुशल कलाकारास रुपये १००/— प्रतिदिनी व सहायक कलाकारास रुपये २५/— प्रतिदिनी प्रात्यक्षिक मानधन देण्यात आले. या कलाकाराचे आर्थिक व्यवहार त्यांच्या श्रमावरच अवलंबून असल्यामुळे व कलावस्तू निर्मिती हा त्यांचा व्यवसाय असल्यामुळे त्यांच्या कुटुंबांच्या निर्वाहासाठी उपरोक्त सवलती त्यांना दिल्या तरच ते मोकळ्या मनाने प्रदर्शनात भाग घेऊ शकतात. मुंबईच्या ४ थ्या प्रदर्शनात आदिवासी हस्तकला व्यवसायातील विविध (१५) कलाकारांनी भाग घेतला.

मुंबईत प्रदर्शनास भरपूर प्रसिद्धी द्यावी लागते. शासकीय माध्यमातून या प्रदर्शनाची केलेली प्रसिद्धी अपुरी पडली. तरीही लोकांचा प्रतिसाद खूप चांगला होता.

मा. मधुकरराव पिचड, आदिवासी विकास, राज्यमंत्री यांनी दिनांक १३ सप्टेंबर १९८८ रोजी या प्रदर्शनाचे उदघाटन केले. मा. स्वरूपसिंग नाईक, आदिवासी विकास मंत्री यांनी प्रदर्शनास भेट दिली. त्याचप्रमाणे शासनाचे मुख्य सचिव, श्री. द. म. सुकथनकरसाहेब यांनी प्रदर्शनास भेट दिली. त्यांना आदिवासी कारागिरी मनापासून आवडल्यामुळे ११ ऑक्टोबर १९८८ रोजी संपूर्ण दुपारभर मुख्य सचिवसाहेबांनी आदिवासी कलेची आस्थेने पाहणी केली. कलाकारांशी बोलून त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या. आदिवासी कलांच्या प्रचारासाठी अशी प्रदर्शने वारंवार भरविण्यास शासन प्रयत्नशील राहील, असा दिलासा त्यांनी कलाकारांना दिला.

या प्रदर्शनाच्या काळात ९२,००० रुपयांच्या वस्तू विकत घेऊन मुंबईच्या प्रेक्षकांनी कलाकारांचे भरघोस कौतुक केले.

या प्रदर्शनाचे वैशिष्ट म्हणजे आदिवासी-लोककलापैकी तारपावादन, झांगळी वादन, गायन, भागसर, थाळगाणे, डाकभगत व तेंडूरवादन या लोककलांची प्रात्यक्षिके प्रेक्षकांना सादर करण्यात आली.

३. आदिवासींच्या पारपरिक कलांना उत्तेजन देण्यासाठी संस्थेने वेळोवेळी प्रदर्शने भरविली. कलास्पर्धा आयोजित केल्या. याच उद्देशाने गेल्या वर्षी वारली चित्रकला, प्रशिक्षण नेतृत्व प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते. वारली कलेतील पारंपरिक शैली त्याला पोषक असे कलाप्रकार वारली चित्रकलेतील प्रतीके इत्यादी बाबी होतकरू आदिवासी कलाकारांना सराव व मार्गदर्शनाद्वारे या शिबिरात शिकविण्यात येते. या शिबिरात ३० प्रौढ व ५० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला होता. याच धर्तीचे प्रशिक्षण शिबिर सर्वोदय छात्रालय, गजाड, तालुका डहाणू, जिल्हा ठाणे येथे दिनांक १३ डिसेंबर १९८८ ते १९ डिसेंबर १९८८ या कालावधीत करण्यात आला.

वैशिष्ट्यपूर्ण आखणी

कला ही शिकवून येत नाही. कलाशिक्षणासाठी अचूक मागदर्शन व सततच्या सरावाची गरज असते. ही बाब विचारात घेऊन या सत्राचे दोन भाग केले होते. ३० प्रौढ स्त्री-पुरुष व ५० विद्यार्थी अशा ८० प्रशिक्षणार्थींचा हा मोठा मेळावा होता. सर्वांना वारली चित्रकला शैलीच्या पारंपरिक सांकेतिक बारकाव्याची ओळख व्हावी यासाठी सर्वांची पहिले तीन तासांचा कार्यक्रम आखण्यात आला होता. त्यासाठी याच भागातील वयोवृद्ध वारली चित्रकला कलाकारांची व्याख्याने, प्रात्यक्षिके आयोजित केली होती. या सर्वसाधारण वर्गासाठी श्री. वासुदेव राजाराम वायेडा, श्री. जिव्या सोमा म्हसे, श्रीमती मधी महादू करमोडा, श्री. निरभवणे यांनी पारंपरिक वारली चित्रशैली संकेत, चौक पद्धती, धलेरीची गाणी इत्यादी बाबी प्रशिक्षणार्थींना समजावून सांगितल्या.

दुसऱ्या भागात प्रत्येकी १६ प्रशिक्षणार्थींचा एक असे ५ गट करण्यात आले होते. प्रत्येक गटाला स्वतंत्र बसविण्यात आले होते. त्यांना या भागातील प्रसिद्ध वारली चित्रकलाकारांकडून लोकाभिमुख वारली चित्रकला वारली चित्रकलेत बदलत्या परिस्थितीत आलेले बेसिक फार्मस्., पाने फुले, वेली, झाडे, पशू, पक्षी, मानव, घरे, गावे इत्यादीबरोबर सौष्ठव, लोकरुची, चित्राद्वारे, कथा इत्यादी बाबींची प्रात्यक्षिके व सराव याद्वारे ओळख करून देण्यात आली. ट्युटोरियल पद्धतीने वैयक्तिक लक्ष पुरविण्यात आले. या सरावामध्ये प्रशिक्षणार्थींना (१५) कुशल वारली चित्रकारांनी मदत केली.

या शिबिरात वारली चित्रकला शैलीची प्राचीन व आधुनिक वैशिष्ट्यांसह होतकरू, प्रौढ, स्त्री-पुरुष वारली चित्रकार व शालेय विद्यार्थी यांना प्रशिक्षणे देऊन वारली चित्रकलेला उत्तेजन देण्याचा उद्देश होता. या कलेची व्याप्ती वाढावी यासाठी ठाणे जिल्ह्यातून खालीलप्रमाणे ३० प्रौढांना बोलविण्यात आले होते.

तालुका—डहाणू	प्रौढ	१८
वाडा		२
पालघर		२
जव्हार		२
मुरबाड		२
शहापूर		२
अकोले		१

या शिबिरात आलेल्या प्रौढ व विद्यार्थी यांना वारली चित्रकला शिकण्याची आवड आहे. वारली चित्रकलेत त्यांना गती आहे. या बाबींची वारली चित्रकला स्पर्धेत त्यांनी काढलेल्या चित्राद्वारे खात्री करून घेण्यात आली. शिबिरासाठी आलेल्या सर्व प्रौढ व विद्यार्थ्यांना चित्रकला व रंग कलेचे सर्व साहित्य व प्रवासखर्च संस्थेने दिला. प्रौढांना दररोज हजेरी भत्ता रुपये १५/— देण्यात आला. या शिबिराच्या आयोजनासाठी सरस्वती शिक्षण संस्थेने बहुमोल सहकार्य दिले. श्री. वासुदेवराव वायेडा यांनी स्वत: सर्व दिवस उपस्थित राहून प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.

प्रशिक्षण कक्ष मार्च १९८९ ते सप्टेंबर १९८९ चे वृत्तविशेष

सर्व प्रशिक्षण सत्रांमध्ये दोन प्रशिक्षण सत्रे खास बाब म्हणून घेण्यात आली आश्रमशाळेतील शिक्षकांचे अध्यापनाचे प्रशिक्षण सत्र खास बाब म्हणून आयोजित करण्यात आले. या सत्राकरिता संचालक, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी प्रशिक्षणार्थींची निवड केली होती आदर्श आश्रमशाळा म्हणून निवड झालेल्या आश्रमशाळांतीलच निवडक शिक्षक या प्रशिक्षणात सहभागी झाले होते. त्याच प्रमाणे सुशिक्षित आदिवासी युवकांकरिता खास प्रशिक्षणसत्र आयोजित करण्यात आले होते. त्यात एकूण १३ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. त्यांना विविध पदाकरिता मुलाखत देण्याच्या दृष्टिकोणातून १० दिवसांचे प्रशिक्षण आयोजित केले होते. त्यापैकी काहीजणांची आदिवासी विभागात संचालकांनी कनिष्ठ लिपिक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. अशा रीतीने प्रशिक्षणाचा लाभ प्रशिक्षणार्थींना हमखास मिळतो याबाबतीत खाली दर्शविलेल्या तक्त्यामध्ये मार्च १९८९ ते सप्टेंबर १९८९ या कालावधीत आयोजित केलेली एकूण प्रशिक्षण सत्राचे विवरण दर्शविले आहे.

मार्च १९८९ ते सप्टेंबर १९८९

(१) आश्रमशाळा अध्यापन प्रशिक्षण-१
(२) आश्रमशाळा चित्रकला प्रशिक्षण-२
(३) सांस्कृतिक —

मार्च १९८९ ते सप्टेंबर १९८९

(४) गृहपाल –१
(५) निरीक्षक –१
(६) सुशिक्षित युवक –८
(७) लिपिकांकरिता खास –१ (१३)
(८) कनिष्ठ लिपक –१
(९) युवकांची शिबिरे –४
(१०) महिलांची शिबिरे –२

अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र तपासणी विभागाचे वृत्तविशेष

आदिवासी विकास खात्याकडे जमातीचे प्रमाणपत्र तपासणीचे काम १९८५ पासून आलेले आहे. हे काम १९८५ पासून संस्था सातत्याने करीत आलेली आहे. या कामासाठी स्वतंत्र समिती नेमलेली आहे. ही समिती वैद्यकीय व अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे जमातीचे प्रमाणपत्र तपासणीचे काम करते. शासन सेवेत अनुसूचित जमातीसाठी राखीव असलेल्या पदावर नियुक्तीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शिफारस करण्यात आलेल्या उमेदवाराच्या जमातीच्या प्रमाणपत्राची तपासणी करणे तसेच इतर खात्याकडून व जिल्हा अधिकारी व तहशिलदार यांच्याकडून येणारी प्रकरणे तपासणे इत्यादी कामे ही समिती करते. ऑगस्ट १९८८ ते ऑगस्ट १९८९ या कालावधीत शैक्षणिक महाराष्ट्र लोकसेवा आयोग, इतर खात्यातील, जिल्हाधिकारी आणि तहसिलदार अशी एकूण (३३७५) प्रकरणे या कार्यालयाकडे तपासणीसाठी आली होती. त्यांपैकी (११९८) वैध होती (१३१७) अवैध झाली (४६०) नस्तीबंद व (४००) प्रलंबित झाली आहेत.

सांस्कृतिक कक्ष—मार्च १९८९ ते सप्टेंबर १९८९ या कालावधीत

आदिवासींचे सांस्कृतिक जीवन व कला यांचे जतन व संरक्षण करण्याच्या दृष्टीने या संस्थेने १९८९–९० या वर्षात आदिवासींच्या जीवनावर दोन रंगीत प्रत्येकी (२०) मिनिटांचे एक असे लघुपट काढण्याचे ठरविले आहे. त्यांपैकी एक लघुपट हा "वारली : एक आदिवासी जमात" व व "नायकडा, थोटी, निहाल अल्पसंख्यांक जमात" या दोन विषयांवर तयार करण्यात येणार आहे.

१९८९–९० या वर्षात गेल्या वर्षाप्रमाणेच आदिवासी जाणीव जागृती सप्ताह माहे डिसेंबर १९८९ किंवा जानेवारी १९९० मध्ये (२००) शासकीय आश्रमशाळांवर आश्रमशाळा केंद्रबिंदू धरून आयोजित करण्यात येणार आहे. या सप्ताहाच्या कालावधीत आश्रमशाळेच्या भोवती असलेल्या वाड्या, पाडे, वस्त्यांतील आदिवासी जनतेला अंधश्रद्धा निर्मूलनाव्यतिरिक्त वन, शिक्षण, शेती, आरोग्य, पशुसंवर्धन, सहकार इत्यादी विविध खात्यामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती देण्यात येणार आहे.

ग्रंथालय वृत्त

संस्थेच्या कामकाजाला मदत व्हावी या उद्देशाने संस्थचे स्वतःचे संदर्भ ग्रंथालय आहे. ग्रंथालयात मुख्यत्वेकरून मानवशास्त्र, समाजशास्त्र, गॅझेटिअर आणि संशोधनात्मक अहवाल आहेत. मार्च १९८९ ते सप्टेंबर १९८९ पर्यन्त ग्रंथालयात १४२ ग्रंथांची भर पडली. सप्टेंबर अखेर ग्रंथालयातील ग्रंथसंख्या ८३०० झाली आहे.

संस्था परिचय

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन.

कार्यकर्त्यांना शिबिराद्वारे प्रशिक्षण देण्यात येते.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे, हे या संस्थेचे मुख्य कार्य आहे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना मुख्यत: आदिवासीबाबत अभ्यासकांना एकत्र आणून सुसंवाद व चर्चासत्रे आयोजित केली जातात.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन

याच उद्देशाने "महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद" स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाने मूर्त स्वरूप म्हणून "**हा का रा**" हे त्रैमासिक सुरू करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

पत्रव्यवहाराचा पत्ता

प्रा. रा. के. मुटाटकर
सचिव,

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
द्वारा—मानवशास्त्र विभाग,
पुणे विद्यापीठ, पुणे . ७

(मार्च १९८९ ते सप्टेंबर १९८९ पर्यन्त संस्थेने पूर्ण केलेले संशोधन, मूल्यमापन, प्रकल्प/अहवाल)

1. Evaluation study of Land Alienation of Tribals in Maharashtra State.
2. Reports on felling of trees Act.
3. Evaluation report of Fisheries Development and their effect on Tribal life.
4. Evaluation study of Ashram schools run by voluntary agencies in Tribal Sub-Plan area.

1. Evaluation study of Grass Monopoly purchase scheme by Tribal Development Corporation in Maharashtra State.
2. Location of new primary health centre in Tribal Sub-Plan Area of Maharashtra State.
3. Evaluation study of Horticulture Development in selected districts of TSP Areas.
4. Project Plan Report ..... Integrated Tribal Development Project, Kinwat ..... (Nanded district 1990-95).

TRIBAL SUB-PLAN

STATEMENT SHOWING PROVISION & EXPENDITURE INCURRED DURING THE YEAR, 1988-89, 1987-88 & OUTLAY PROPOSED FOR 1989-90

Tribal sub-plan Area and outside Tribal sub-plan Area of Maharashtra State

Sr. No.	Sector	T. S. P & O. T. S. P. Provision and Expenditure for the year, 1988-89.		T. S. P. Provision and Expenditure previous year, 1987-88.		T. S. P. & O. T. S. P. Prosposed outlay for 1989-90
		Budget provision	Expenditure	Budget provision	Expenditure	
1	2	3	4	5	6	7
1	Crop Husbandry	236.64	173.60	164.28	177.92	320.74
2	Land Reforms	13.44	15.58	6.73	3.69	10.51
3	Minor Irrigation	929.72	870.68	1203.60	889.83	1189.92
4	Soil conservation	44.31	41.53	26.05	33.07	30.00
5	Ayacut Development	8.00	8.00	16.00	3.41	11.50
6	Animal Husbandry	143.19	130.84	140.47	109.82	165.47
7	Dairy Development	187.05	144.93	133.27	108.74	201.96
8	Fisheries	57.75	54.55	32.56	29.95	51.63
9	Forest	541.83	535.14	399.32	348.08	680.74
10	D. P. A. P.	75.00	110.60	81.00	156.00	95.50
11	I. R. D. P.	500.00	453.37	509.30	537.84	612.50
12	Co-operation	43.33	41.52	66.90	36.22	32.88
13	Water Development	1699.22	1776.42	1444.37	1688.93	1830.98
14	Power Development	1437.00	1637.39	1000.00	1201.59	1907.55
15	Industries and Minings	287.04	191.02	155.96	88.45	111.69
16	Road and Bridges with (MSRTC)	1986.31	1996.31	1313.50	1056.19	2756.71
17	Port and Herbours	—	—	—	—	—
18	Tourism	—	—	0.25	—	6.00
19	General Education	746.27	718.54	576.30	377.64	1225.34
20	Medical and Public Health	639.00	636.32	1102.89	969.72	840.34
21	Water supply and Sewerages	1133.57	844.17	1046.36	1175.39	1302.05
22	Housing	64.30	22.39	13.25	79.38	71.39
23	Urban Development	50.25	50.25	43.85	45.23	66.36
24	Information and publicity	11.00	9.90	12.72	9.57	37.83
25	Labour and Labour Welfare	123.43	111.74	248.43	78.90	250.35
26	Welfare of B. C.	1378.78	1393.17	1075.40	1072.29	1409.88
27	Nutrition	86.40	86.40	93.39	93.39	63.05
28	Employment Guarantee Scheme	2200.00	2200.00	1900.00	1900.00	2699.93
29	Horticul ure	59.09	21.08	177.60	25.96	44.96
30	Social Forestry	127.27	125.92	161.60	149.39	125.25
31	Food, storage and warehousing	—	—	0.60	0.50	0.10
32	N. R. E. P.	731.50	329.77	192.26	259.49	713.40
33	Technical Education	25.75	26.05	73.74	9.46	63.93
34	Others	—	4.38	—	—	8.97
35	Sports and Youth services	7.89	4.71	12.84	4.37	22.77
36	C. A. D. A.	—	—	6.88	—	—
37	Wardha plan	—	—	—	—	9.00
38	Feltneed programme of district	745.00	745.00	—	—	745.00
39	Special Action plan for Gadchiroli district and selected Area of Chandrapur district.	—	—	—	—	500.00
	Grand Total :	16319.33	15511.27 —	13431.67	12720.41 —	20216.18

Note :—Budget Provision and expenditure for the year 1988-89 as proposed outlay 1989-90 are inclusive of T. S. P. and O. T. S. P.

STATEMENT SHOWING TARGET AND ACHIEVEMENT DURING THE YEAR, 1987–88, 1988–89 AND TARGET FIXED FOR 1989-90

Sr. No.	Sector/Scheme	Item	Units	1987-88 Target	1987-88 Achievement	1988-89 Target	1988-89 Achievement	Target proposed for 1989-90
1	2	3	4	5	6	7	8	9
	(1) CROP HUSBANDRY							
1	Supply of minikits	Beneficiaries	No.	22698	27244	20000	27314	20000
2	Supply of bullock and bullock carts	,,	No.	169	603	668	742	755/736
	(2) HORTICULTURE							
1	Subsidy for development of Horticulture.	,,	No.	400	333	400	362	560
2	Promition of vegitable development	Minikits	No.	5283	4672	1700	4021	4930
	(3) LAND REFORMS							
1	Financial Assistance to the assignees of surplus land subsidy.	Beneficiaries	No.	200	181	550	469	190
2	Financial Assistance to the tribals for restoration of the alienated land.	,,	No.	350	99	172	276	200
3	Financial Assistance to Tribal tenant purchase to pay of purchase price under Tenancy land.	,,	No.	250	101	91	87	100
	(4) SOIL CONSERVATION							
1	Soil conservation works	C. B. Units	No.	800	800	—	—	—
		plantation	Area in Hectare	—	69000	40000	40000	4000
	(5) ANIMAL HUSBANDRY							
1	L. S. Supervisor Trainings	Trainees	No.	16	4	7	4	6
2	Supply of medicines to existing veterinary Insti.	Institution	No.	279	279	284	284	—
3	Supply of Milch animals	Beneficiaries	No.	285	443	475	585	430
4	Supply of Goat units.	,,	No.	138	202	753	710	729
5	Supply of Duck units.	,,	No.	180	295	166	218	216
6	Supply of day old chicks	Units	No.	868	1902	2232	2400	2411
7	Control of foot and mouth diseases.	Doses	No.	137600	136026	127500	127500	124000
8	Gokul Gram schemes.	Area	Hect.	10	9	12	12	—
	(6) AYACUT DEVELOPMENT							
1	Land Development	Area	Hect.	2000	1983	1600	1600	2000
	(7) DAIRY DEVELOPMENT							
1	Training for Adiwasis	Trainees	No.	1200	1365	1600	1535	1655
2	Supply one year old high progency buffaloes calves.	Beneficiaries	No.	1556	1138	1600 (400)	1050	1077
3	Supply of Dry pregnant buffaloes calves.	,,	No.	600	597	900 (300)	708	356
4	Fodder Development	Plot	No.	600	691	900 (300)	850	1030
5	Transport cost of feeding cost. (Dry pregnant buffaloes)	Beneficiaries	No.	600	528	900 (300)	587	931
6	Govt. Milk schemes	Functioning	No.	10	9	10	9	10
	(8) FISHERIES							
1	Fish forming in impounded water	Fish production	in Tones	4705	4663	4705	4500	4500
2	Establishment of fish seed production centres.	form function	No.	8	9	7	7	7
	(9) FOREST							
1	Supply of Bicycles to Adiwasis forest labourers.	Beneficiaries	No.	352	257	—	—	—

Sr. No. 1	Sector/Scheme 2	Item 3	Units 4	1987-88 Target 5	1987-88 Achievement 6	1988-89 Target 7	1988-89 Achievement 8	Target posed for 1989-90 9
2	Supply of Bullock carts and Bulloek pairs.	Beneficiaries	No.	191	92	—	—	85
3	Supply logging equipment	,,	No.	1255	1685	—	—	32
4	Raising of Nurseries seeding through Adiwasi.	,,	No.	293	151	—	—	2
	(10) SOCIAL FORESTRY :—							
1	Maharashtra Social forestry project	Area	No. in Hect	649	632	638	638	638
		Premansoon work.	Hect.	1975	71	144	144	144
		F. Y. O.	Hect.	2561	2248	3202	3202	—
		S. Y. O.	Hect.	944	914	2231	2231	
		F. Y. O.	Hect.	1373	1373	2156	2156	—
		F. Y. O.	Hect.	769	769	769	769	—
		Seedling	No. in lacs	14.77	14.77	14.77	14.77	—
	(11) DROUGHT PRONE AREA PROGRAMME :							
1.	D. P. A. P. No. of Blocks.	Functioning	No.	2	2	2	2	2
	(12) INTEGRATED RURAL DEVELOPMENT PROGRAMME							
1	I. R. D. P. Programme shcemes	Blocks covered wholly	No.	19	19	19	19	13
		Beneficiaries	No.	28000	45687	42000	43153	43569
	(13) CO-OPERATION							
1	Seven year interest free for purchase of shares	Beneficiaries	No.	23533	17498	12930	12930	13770
2	Bad debts reserves	Societies	No.	98	56	65	65	43
3	Interest subsidy to tribals	Beneficiaries	No.	1375	1247	1895 (200)	1895	15147
4	Godown amenities.	Societies	No.	—	—	—	—	—
5	Staff quarters.	Quarters	No.	100	266	4	4	4
6	Sugar factories.	Members	No.	463	647	850	924	253
7	No. of Adiwasis co-operative society functioning.	Societies.	No.	275	275	275	275	275
	(14) MAJOR AND MEDIUM PROJECTS							
1	Major Projects.	Projects.	No.	5	5	5	5	5
2	Medium Projects.	Project	No.	21	21	22	22	23
	(15) POWER DEVELOPMENT							
1	Rural Electrification Programme.	Villages Electrified.	No.	37	50	250	708	250
		E. M. PUMPS	No.	775	1275	2000	5677	2000
	(16) INDUSTRY AND MININGS							
1	Purchase of shares of Co-op. spining mills.	Members	No.	1000	500	250	250	500
2	Black level villages Artisans. Multipurpose. co-operative societies.	Societies	No.	—	17	23	23	18
	(17) ROADS AND BRIDGES :—							
1	New construction.	Length Bridges.	K. M.	205	154	200	200	—
2	Construction of Bridges and Culverts.	Bridges	No	12	11	11	11	—
		C. S. works.	No.	90	48	48	48	—

1Sr. No. 1	Sector/Scheme 2	Item 3	Units 4	1987-88 Target 5	1987-88 Achievement 6	1988-89 Target 7	1988-89 Achievement 8	Target proposed for 1989-90 9
(18)	**GENERAL EDUCATION**							
1	Primary schools	Functioning	No.	—	6606	—	6820	—
2	Secondary Schools	,,	No.	—	357	357	357	—
3	Book Banks in primary schools	Students	No.	178000	178000	95181	95181	125000
4	Book Banks in Secondary schools	,,	No.	24000	24000	10300	10300	55000
5	Stipend to tribal students.	,,	No.	17000	9000	5600	5600	26924
6	Special facilities to S. C. S. T. students.	,,	No.	22000	26000	40000	40000	53740
7	Incomplete construction work of schools.	Works.	Rooms	142	101	52	52	200
8	Appointment of teachers in schoolless villages.	Teachers	No.	800	800	547	1011	1038
(19)	**HEALTH SERVICES**							
1	Primary Health Centres.	Functioning	No.	287	237	287	237	237
2	Sub-Centres.	,,	No.	—	1593	—	1593	—
3	Rural Hospital	,,	No.	—	47	—	47	47
(20)	**SEWARAGE AND WATER SUPPLY**							
1	Well construction- Simple Measures	wells	No.	92	60	22	22	22
2	Piped water supply	Schemes	No.	249	249	160	160	160
3	Boaring operations of G. S. D. A.	Bores	No.	579	603	160	160	160
(21)	**HOUSING**							
1	Huts under R. L. E. G. P.	Beneficiaries	No.	2357	1667	1100	2511	—
(22)	**INFORMATION AND PUBLICITY**							
1	Publicity Cells.	Cells	No.	—	18	—	18	—
2	T. V. Sets.	Sets.	No.	80	94	70	70	380
(23)	**URBAN DEVELOPMENT :—**							
1	Municipal Councils assisted.	Municipal council	No.	7	7	7	7	7
(24)	**LABOUR AND LABOUR WELFARE**							
1	Craftsman Training	No./Ceats	No.	14/2316	14/2316	14.2150	14 2150	—
2	V. E. Guidance *cum* centres.	Centres	Student	300	288	289	300	300
(25)	**WELFARE OF B. C. :—**							
1	Ashram Schools	Functioning	No.	—	431	—	455	—
2	Distribution of pump sets.	Beneficaries	No.	781	1412	876	2104	879
3	Supply of oil Engines.	,,	No.	100	313	130	422	180
4	Grants of tuition fees	,,	No.	1160	1617	2070 (1350)	2070	2800
5	Award of Scholarship	,,	No.	—	—	—	—	—
6	Scholarship to student in I. T. Is.	,,	No.	108	108	925 (650)	925	441
7	Supply of mengolary tiles.	,,	No.	1160	450	1752	2523	3646
(26)	**NUTRRN** : 1. I. C. D. S.	Centres	No.	—	39	—	40	—
	2. I. C. D. S.	Beneficiaries	No.	40561	46987	234000	232000	232000

NOTE : —Figures in brackets relate to outside tribal sub-plan.

सांख्यिकी माहिती

महाराष्ट्र राज्यातील आदिवासींमधील मुख्य कामगारांची व्यवसायानुसार लोकसंख्या व त्यांचे प्रमाण

(१९८१ च्या जनगणनेनुसार)

अ. क्र.	व्यवसाय	लोकसंख्या (आकडे लाखांत)	आदिवासी लोकसंख्येशी व मुख्य कामगारांशी शेकडा प्रमाण
१	२	३	४
१	आदिवासी लोकसंख्या	५७.७२	१००.००
	(अ) मुख्य कामगार	२७.७५	४८.०८
	(ब) इतर	२९.९७	५१.९२
२	एकूण मुख्य कामगार	२७.७५	१००.००
३	शेतकरी	१०.९३	३९.३९
४	शेतमजूर	१२.५१	४५.०८
१	इतर कामगार	४.३१	१५.५३
	(अ) पशुसंवर्धन शिकार	०.८९	३.२१
	(ब) खाणकाम	०.०८	०.२९
	(क) घरगुती उद्योगधंदे	१.२६	४.५४
	(ड) बांधकाम	०.३७	१.३३
	(इ) व्यापार उद्योग वाणिज्य	०.४६	१.६६
	(फ) वाहतूक	०.३१	१.१२
	(ग) इतर सेवा	०.९४	३.३८

महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आदिवासी लोकसंख्या, मुख्य कामगार, शेतकरी, शेतमजूर व इतर व्यवसाय करणाऱ्या कामगारांची संख्या व त्यांचे शेकडा प्रमाण [१९८१ चे जनगणनेनुसार]

(लोकसंख्या लाखात)

अ. नं.	जिल्हा	एकूण	मुख्य कामगार			
			एकूण	शेतकरी	शेतमजूर	इतर व्यावसायिक
१	२	३	४	५	६	७
	महाराष्ट्र राज्य	५७.७२	२७.७५ (१००.००)	१०.९३ (३९.३९)	१२.५१ (४५.०८)	४.३१ (१५.५३)
१	बृहन्मुंबई	०.८४	०.०५ (१००.००)	०.०० —	०.०० —	०.०५ (१००.००)
२	ठाणे	७.२९	१.४९ (१००.००)	०.८२ (५५.०४)	०.५५ (२९.५४)	०.१२ (१५.४२)
३	रायगड	१.९०	०.३३ (१००.००)	०.०८ (२४.२५)	०.१५ (४५.४६)	०.१० (३०.२९)
४	रत्नागिरी व	०.३२	०.०६	०.००	०.०१	०.०५
५	सिंधुदुर्ग		(१००.००)	—	(१६.६७)	(८३.३३)
६	नाशिक	७.०२	१.५० (१००.००)	०.६१ (४०.६७)	०.८४ (५६.००)	०.०५ (३.३३)
७	धुळे	८.३१	१.३९ (१००.००)	०.३७ (२६.६२)	०.९७ (६९.७९)	०.०२ (३.५९)
८	जळगाव	२.१६	०.४५ (१००.००)	०.०६ (१३.५४)	०.३७ (८२.२३)	०.०२ (४.०२)
९	अहमदनगर	१.८८	०.४० (१००.००)	०.११ (४५.००)	०.२० (५०.००)	०.०९ (५.००)
१०	पुणे	१.५९	०.२४ (१००.००)	०.१५ (६२.५०)	०.०८ (३३.३४)	०.०१ (४.१६)
११	सातारा	०.१३	०.०२ (१००.००)	०.०० —	०.०१ (५०.००)	०.०१ (५०.००)
१२	सांगली	०.१६	०.०१ (१००.००)	०.०० —	०.०१ (१००.००)	— —
१३	सोलापूर	०.५२	०.०५ (१००.००)	०.०१ (२०.००)	०.०४ (८०.००)	— —
१४	कोल्हापूर	०.२७	०.०३ (१००.००)	०.०१ (३३.३४)	०.०१ (३३.३४)	०.०१ (३३.३२)
१५	औरंगाबाद व	०.७६	०.१५	०.०३	०.११	०.१
१६	जालना		(१००.००)	(२०.००)	(७३.३४)	(६.६६)
१७	परभणी	०.७९	०.१८ (१००.००)	०.०६ (३३.३४)	०.११ (६१.१२)	०.०१ (५.५४)

(लोकसंख्या लाखात)

अ. नं.	जिल्हा	एकूण	मुख्य कामगार			
			एकूण	शेतकरी	शेतमजूर	इतर व्यावसायिक
१	२	३	४	५	६	७
१८	बीड	०.१३	०.०२ (१००.००)	०.०० —	०.०२ (१००.००)	— —
१९	नांदेड	१.७१	०.३२ (१००.००)	०.११ (३४.३८)	०.२० (६२.५०)	०.०१ (३.१२)
२०	उस्मानाबाद व	०.५२	०.०७	०.०२	०.०५	—
२१	लातूर		(१००.००)	(२८.५८)	(७१.४२)	—
२२	बुलढाणा	०.६६	०.१६ (१००.००)	०.०५ (३१.२५)	०.११ (६८.७५)	— —
२३	अकोला	१.१५	०.२६ (१००.००)	०.०६ (२३.०८)	०.१९ (७३.०८)	०.०१ (३.८४)
२४	अमरावती	२.४२	०.४७ (१००.००)	०.१३ (२७.६६)	०.३२ (६८.०९)	०.०२ (४.२५)
२५	यवतमाळ	३.७०	०.८९ (१००.००)	०.१६ (१७.९८)	०.७१ (७९.७८)	०.०२ (२.२४)
२६	वर्धा	१.४२	०.३१ (१००.००)	०.०४ (११.९१)	०.२५ (८०.६५)	०.०२ (७.४४)
२७	नागपूर	३.५३	०.४९ (१००.००)	०.०७ (१४.२८)	०.२७ (५५.१०)	०.१५ (३०.६२)
२८	भंडारा	२.९८	०.६४ (१००.००)	०.२१ (४३.७५)	०.२५ (३९.०६)	०.१८ (१७.१९)
२९	चंद्रपूर व	२.५०	१.०३	०.४७	०.४८	०.०८
३०	गडचिरोली		(१००.००)	(४५.६३)	(४६.६०)	(७.७७)

टीप.—कंसातील आकडे शेकडा प्रमाण दर्शवितात.

आदिवासींना खावटी कर्ज देणे या योजनेखाली आदिवासींच्या खावटी कर्जाच्या येणे रकमा निर्लेखित करणे

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन निर्णय क्र. टीडीसी १०८८/(५७४) का. ३
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक १ मार्च १९८९

प्रस्तावना :—महाराष्ट्र आदिवासी आर्थिक स्थिती (सुधारणा) अधिनियम, १९७६, अन्वये जनजाती क्षेत्रातील आदिवासींची सावकार व व्यापारी ज्या पद्धतीने पिळवणूक करीत होते त्या पालेमोड सावकारी पद्धतीवर बंदी घालण्यात आली. ही योजना बंद केल्यामुळे आदिवासींना कर्ज मिळणे सुलभ व्हावे या हेतूने पर्यायी व्यवस्था म्हणून राज्य शासनाने शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक टीएसपी /१०७८/२००५५/डी-चोसीस (दोन), दिनांक १७ जून १९७८ अन्वये आदिवासींना खावटी कर्ज देण्याची योजना मंजूर केली व ही योजना राबविण्याकरिता महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळास प्रमुख अभिकर्ता म्हणून नेमले. तसेच या योजनेच्या प्रयोजनाकरिता आदिवासी विकास महामंडळाकडे रुपये ३ कोटींचा फिरता निधीसुद्धा निर्माण करण्यात आला. या योजनेखाली हंगामासाठी सीमांकित आदिवासी शेतकऱ्यांच्या कुटुंबांना प्रत्येकी रुपये २५० व भूमिहीन आदिवासी शेतमजुरांना प्रत्येक कुटुंबामागे रुपये १००, तसेच शासन व इतर संस्थांच्या कर्जाच्या बाकीदारांना रुपये १२५ या प्रमाणात रुपये ७.५ टक्के व्याजाच्या दराने खावटी कर्ज दिले जाते. माहे जून १९८८ अखेर रुपये ४.७० कोटी एवढ्या रकमेचे कर्ज वाटप झाले, त्यापैकी माहे सप्टेंबर १९८८ पर्यन्त रुपये २.२३ कोटी एवढी वसुली झाली. आदिवासींना आत्यंतिक गरिबीच्या परिस्थितीमुळे त्यांच्याकडून येणे असलेल्या रकमांची परतफेड करण्याच्या परिस्थितीत नसल्यामुळे परिणामतः ते थकबाकीदार ठरल्यामुळे एकात्मीकृत ग्रामीण विकास कार्यक्रम तसेच शासनाच्या इतर कार्यक्रमाखाली सहाय्य मिळण्यास ते पात्र ठरत नाहीत. म्हणून शासनाने खावटी कर्ज योजनेखाली आदिवासींकडे थकित असलेल्या रुपये २.४७ कोटी कर्जाची वसुली माफ करण्याचा निर्णय घतला आहे.

निर्णय :—आदिवासींना खावटी कर्ज देणे या योजनेखाली आदिवासी शेतकरी व भूमिहीन आदिवासी शेतमजुरांना उपरोक्त रु. ३ कोटीच्या फिरत्या निधीतून माहे जून १९८८ पर्यंत मंजूर केलेल्या खावटी कर्जापैकी दिनांक ३० सप्टेंबर १९८८ पर्यंत थकित असलेली रु. २.४७ कोटी एवढी कर्जाची रक्कम निर्लेखित करण्यास शासन मंजुरी देत आहे.

ही कर्जमाफीची रक्कम आदिवासी विकास महामंडळाते संबंधित कर्ज बाकीदाराकडून वसूल करू नये. तसेच संबंधित लाभार्थींना, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व महसूल अधिकाऱ्यांना यासंबंधात महामंडळाने कळवावे.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर २५५/व्यय-११, दिनांक २७ फेब्रुवारी १९८९ अन्वये निर्गमित झाला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

आदिवासींसाठी राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक/कौटुंबिक लाभाच्या योजनांचा लाभ देताना घ्यावयाची काळजी

महाराष्ट्र शासन

आदिवासी विकास विभाग

शासन परिपत्रक क्र. पीसीआर-१०९९/९२/प्र. क्र. ६१-८८/का. १६
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक २१ ऑगस्ट १९८९

परिपत्रक

आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींसाठी योजना आखण्याच्या संदर्भात शासनाने नेमलेल्या निवड समितीने अशी शिफारस केली आहे की, आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींना वैयक्तिक/कौटुंबिक लाभाच्या योजनांचा फायदा देतेवेळी सदर आदिवासी हे खरे आदिवासी आहेत याची खात्री करून त्यांचे फायदे उपलब्ध करून देण्यात यावेत आणि कार्यक्रम राबविणाऱ्या अधिकाऱ्यांनी याबाबत विशेष दक्षता घ्यावी. निवड समितीची वरील शिफारस लक्षात घेऊन शासन आता असे आदेश देत आहे की, आदिवासी उपयोजना क्षेत्र तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील आदिवासींसाठी शासन ज्या वैयक्तिक/कौटुंबिक लाभाच्या योजना राबवीत आहे, त्याचा फायदा देताना लाभधारक हा खरा आदिवासी आहे याची खातरजमा करून घेण्यात यावी. त्या संदर्भात काही अडचण असल्यास संबंधित योजनेच्या अंमलबजावणी अधिकाऱ्यांनी संबंधित जिल्ह्यातील आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी / आदिवासी विकास अधिकारी यांचेकडून आदिवासी लाभधारकाची यादी मंजूर करून घ्यावी व तशी मंजुरी मिळाल्यावरच संबंधितांना लाभ देणेत यावा. लाभधारकांची यादी मंजूर संबंधित प्रकल्प अधिकारी / आदिवासी विकास अधिकारी यांचेकडून मंजूर करून न घेताच देणेत आलेली आर्थिक मदत संबंधित अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर त्याची जबाबदारी टाकली जाईल. कोणत्याही परिस्थितीत आदिवासींसाठी दिले जाणारे फायदे बिगर आदिवासींना दिले जाणार नाहीत याबाबत काळजी घ्यावी.

२. सर्व मंत्रालयीन विभागांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वरील आदेश त्यांच्या आधिपत्याखालील सर्व अंमलबजावणी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

रा. बा. जठार,
अवर सचिव.

TRIBAL RESEARCH BULLETIN

Tribal Research and Training Institute, Maharashtra State, Pune 411 001

Tribal Research Bulletin is a Bi-Annual Bulletin published in March and September. Contributors can contribute articles pertaining to Tribal Research.

Guidelines for Contributors

The normal length of an article should be between 1,500 to 3,000 words.

The manuscripts to be published in this Bulletin should be type wri ten in double space on one side of the paper and carefully corrected for any typing errors. The matter should be organised under suitable headings.

Manuscripts are not returned.

The Editor is not responsible for the views expressed by the writers in this Bulletin.

Ten off-prints with a copy of the Bulletin are supplied free of charge to the Contributor. Remuneration at the rate of Rs. 10 per printed page and maximum Rs. 30 for an article will be paid. All correspondence should be addressed to the Editor, Tribal Research Bulletin, Tribal Research and Training Institute, 28, Queen's Garden, Pune 411 001.

Sketch on front page :

Shri. P. T. LONKAR

Registration No. RN-37438/79

FORM IV

(*See* Rule 8)

1. *Place of publication* .. 28, Queen's Garden, Pune 411 001.

2 *Periodicity of publication.* Bi-Annual.

3. *Printer's name* .. Manager, Yeravda Prison Press, Pune 411 006.

Nationality .. Indian

Address .. Yeravda Prison Press, Pune 411 006.

4. *Publisher's name* .. G. M. GARE

Nationality .. Indian

Address .. 28, Queen's Garden, Pune 411 001.

5. *Editor's name* .. G. M. GARE

Nationality .. Indian

Address .. 28, Queen's Garden, Pune 411 001.

I, G. M. Gare, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

G. M. GARE

(Signature of Publisher)

Dated 1st September 1989.

Price Rs. 4-00